पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १७२ ■ सोमवार, दि. २९ डिसेंबर २०२५ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 /49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 ■ http://epaper.citynewssuperfast.com

RRC NEWS
@RRCDIGITALAKOLA
RRC NEWS पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा !
ओपन, लाईक, सबस्क्राईब करा




## १ जानेवारीपासून होणार महत्त्वाचे बदल!

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**मुंबई :** २०२५ संपायला अवघे २ दिवस उरले आहेत. २०२६ मध्ये अनेक महत्त्वाचे बदल होणार आहेत. १ जानेवारी २०२६ पासून आठवा वेतन आयोग लागू केला जाणार आहे. ३१ डिसेंबरपासून ७ वा वेतन आयोग संपणार आहे. दरम्यान, आठव्या वेतन आयोगाअंतर्गत पगारवाढ येण्यास उशिर होईल. दर महिन्याच्या १ तारखेला इंधनाच्या किंमतीत बदल होतात. त्यामुळे जानेवारीत एलपीजी गॅसच्या किंमती वाढ किंवा घट होऊ शकते. आधार पॅन कार्ड लिंक करण्यासाठी शेवटची तारीख ३१ डिसेंबर २०२५ आहे.

## प्रतापराव जाधव यांच्या कारला भीषण अपघात!

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**बुलडाणा :** केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या कारला भीषण अपघात झाला. समृद्धी महामार्गावर वाशिम जिल्ह्यातील मालेगावनजीक ही घटना घडली. कारने ट्रकला जोरदार धडक दिली. हा अपघात झाला तेव्हा मंत्री कारमध्ये नव्हते त्यामुळे मोठी दुर्घटना टळली. या अपघातामध्ये तिघे जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिस या अपघाताचा तपास करत आहेत. केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांना नागपूर विमानतळावर सोडल्यानंतर त्याचे अंगरक्षक, सहकारी आणि कारचालक हे मेहकरच्या दिशेने जात होते. याचदरम्यान मध्यरात्री समृद्धी महामार्गावर त्याच्या कारला भयंकर अपघात झाला.

## आचारसंहितेचा भंग; गुन्हा दाखल!

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**जळगाव :** महापालिकेच्या निवडणुकीसाठी भाजपसह शिवसेना (एकनाथ शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) यांच्यातील जागा वाटपाचा तिढा सुटलेला नसताना, महायुतीच्या दोन्ही मंत्र्यांसह आमदारांनी शासकीय विश्रामगृहात बैठक घेतल्याने नव्या वादाला तोंड फुटले आहे. निवडणूक पार्श्वभूमीवर, आचारसंहिता सुरू असताना दोन्ही मंत्री आणि आमदारांकडून शासकीय विश्रामगृहाचा गैरवापर झाल्याच्या मुद्द्यावर शिवसेनेच्या ठाकरे गटाने बोट ठेवले आहे. मंत्र्यांसह आमदारांनी आचारसंहितेचे उल्लंघन केल्याचा आरोप करून त्या संदर्भात तक्रार ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख कुलभूषण पाटील यांनी जिल्हाधिकारी रोहन घुगे यांच्याकडे केली आहे.

# अकोल्यात महायुती होते की नाही ?

## कार्यकर्त्यांना प्रश्न, नेते मात्र बिनधास्त




### बेगानी शादी में अब्दुला दिवाना

एका लोकप्रतिनिधीला मराठवाड्यातील एका महापालिकेची जबाबदारी दिली असताना आणि मुळात त्यांच्या मागे अकोल्यातील एक ही नगरसेवक नसताना आपण महायुतीची चर्चा करणार नाही. स्वपक्षासाठी सन्मानजनक जागा पाहिजे असा फोल दावा करत स्वतःला मिडियात चमकविण्याचा उद्योग एका लोकप्रतिनिधीने केला आहे. मागे एक माजी नगरसेवक नाही, नगर परिषदेत झालेल्या दारुण पराभव गाठीशी असताना तोंडाची वाफ गमविण्यात अग्रेसर असलेला बेनागी शादी मधील अब्दुला दिवाना कोन असा प्रश्न राजकीय पातळीवर विचारला जात आहे.

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**अकोला:** अकोल्यात महायुतीत भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यात गेल्या दोन दिवसांपासून चर्चा सुरू असल्या तरी जागावाटपावर एकमत होऊ शकलेले नाही. अकोला महानगरपालिका निवडणूक शेवटच्या टप्प्यात अधिकच चुरशीची ठरत असून, राजकीय घडामोडींनी शहरातील वातावरण तापले आहे. निवडणूक जाहीर होऊनही अद्याप प्रमुख राजकीय पक्षांमध्ये आघाडी आणि तिकीट वाटपाचा तिढा सुटलेला नाही. मंगळवारी उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या दिवशी मोठी गर्दी होण्याचे चिन्हं आहे.

महायुती आणि महाविकास आघाडी या दोन्ही आघाड्या न झाल्याने सर्वच पक्षांसमोर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.महायुतीत भाजप, शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) यांच्यात गेल्या दोन दिवसांपासून चर्चा सुरू असल्या तरी जागा वाटपावर एकमत होऊ शकलेले नाही. इकडे काही प्रभागांतील जागांवरून भाजप राष्ट्रवादी व शिवसेना मध्ये मतभेद कायम असून, विशेषतः ज्या ठिकाणी भाजपचे 'रनिंग कँडिडेट' आहेत त्या जागांवर भाजप ठाम असल्याचे चित्र आहे. मात्र उर्वरित जागांवर इतर पक्षांसाठी बार्गेनिंग करण्याची तयारी भाजपने दर्शविल्याचे समजते.

दुसरीकडे महाविकास आघाडीची स्थितीही अनिश्चितच आहे. उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाची शिवसेना, शरद पवार गटाची राष्ट्रवादी काँग्रेस आणि मनसे यांच्यात अद्याप ठोस आघाडी झालेली नाही. सध्या महाविकास आघाडीची एक गोपनीय बैठक सुरू असल्याची माहिती असून, या बैठकीत शिवसेनेचे आमदार नितीन देशमुख यांनी महत्त्वाची भूमिका मांडली आहे. महायुतीतील घटक पक्ष असलेल्या राष्ट्रवादी अजित पवार गटाने मुस्लिमबहुल भागात कोणाला तिकीट दिले जाते, यावर निर्णय झाल्यानंतरच पुढील भूमिका ठरवली जाईल, अशी भूमिका त्यांनी घेतल्याचे समजते. एकूणच अकोला महानगरपालिका निवडणूक ही स्थानिक राजकारणापुरती मर्यादित न राहता, राज्यातील बदलत्या राजकीय समीकरणांची लिटमस टेस्ट ठरत आहे. आघाड्या रखडल्याने अनेक पक्ष स्वबळावर लढण्याची तयारीही ठेवत असल्याचे संकेत आहेत. येत्या काही दिवसांत तिकीट वाटप आणि आघाड्यांबाबत अंतिम निर्णय होणार का, याकडे अकोल्यातील नागरिकांसह राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

### भाजपचा उमेदवारांना सल्ला

भाजपने प्रमुख उमेदवारांना अर्ज दाखल करण्याचा सल्ला दिला आहे. त्याच बरोबर मंगळवारी एबी फार्म हा पक्षाच्या वतीने लावण्यात येणार असल्याची माहिती आहे. बंडखोरांना यामुळे लगाम लागणार असून महायुती झाली तर भाजपचे त्या त्या प्रभागातील उमेदवार अर्ज मागे घेतील अशी माहिती सुत्रांनी दिली आहे. तर ज्या ठिकाणी महायुती होईल त्या ठिकाणी युती होणाऱ्या पक्षांचे उमेदवार निवडणुका लढणार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

## ▸▸ अकोला महानगरपालिका निवडणूक ▸▸ विजयाची गणिते बिघडवण्यासाठी

# 'त्या' डमी उमेदवारांना 5 ते 7 लाखांची ऑफर !



प्रतिनिधी २९ डिसेंबर

**अकोला :** महानगरपालिका निवडणुकीचे बिगुल वाजण्यापूर्वीच अकोल्याच्या राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. सत्ता मिळवण्यासाठी आणि प्रतिस्पर्ध्यांचा पत्ता कट करण्यासाठी आता 'साम-दाम-दंड-भेदा'चा वापर सुरू झाला असून, निवडून येण्याची क्षमता असलेल्या उमेदवारांना पाडण्यासाठी चक्क ५ ते ७ लाख रुपयांची 'ऑफर' दिली जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अकोला महापालिकेच्या विविध प्रभागांमध्ये जे दिग्गज उमेदवार विजयाकडे अग्रेसर मानले जात आहेत, त्यांना रोखण्यासाठी विरोधकांनी नवी खेळी आखली आहे. प्रस्थापित पक्षांच्या तगड्या उमेदवारांची हक्काची मते फोडण्यासाठी अपक्ष उमेदवारांचा 'बळी' दिला जाणार आहे.या प्रक्रियेत केवळ मतांचे विभाजन करणे हा मुख्य उद्देश आहे. या रणनीतीचे काही महत्त्वाचे पैलू समोर आले आहे. प्रत्येक प्रभागात असे २ ते ३ डमी उमेदवार उभे केले जाणार आहेत, जे प्रस्थापित उमेदवाराच्या जातीचे किंवा त्याच परिसरातील प्रभावी गटाचे असतील. या उमेदवारांना निवडून यायचे नसून, त्यांना फक्त १०० ते २०० मते घेण्याचे टार्गेट देण्यात आले आहे. ही १००-२०० मते अशा ठिकाणची असतील जी प्रामुख्याने आघाडीवर असलेल्या उमेदवाराची 'हक्काची मते' आहेत. केवळ उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आणि प्रचाराचा देखावा करण्यासाठी संबंधित अपक्ष उमेदवारांना ५ ते ७ लाख रुपये देऊ केले जात आहेत. पक्षाच्या उमेदवाराला पाडण्यासाठी ५ ते ७ लाखांची ऑफर असून त्या दृष्टीने व्यापक प्रयत्न सुरु झाले आहे. अकोला महापालिकेत विजयाकडे जे उमेदवार अग्रेसर आहे. त्या उमेदवारांना पाडण्यासाठी ५ ते ७ लाखांची ऑफर असल्याची माहिती समोर आली आहे. एका प्रभागात असे दोन ते तीन उमेदवार पक्षीय उमेदवार देणार असून ते अपक्ष असतील. त्यांना या ऑफर मध्ये फक्त उमेदवारी अर्ज दाखल करुन शंभर ते दोनशे मते घ्यायचे आहे.

### अपक्ष उमेदवारांचा 'हुकमी एक्का' म्हणून वापर

अनेक प्रभागांमध्ये विजयाचे अंतर खूप कमी असते. अशा वेळी एखादा अपक्ष उमेदवार जर २०० मते जरी घेऊन गेला, तरी मोठ्या पक्षाच्या उमेदवाराचा पराभव निश्चित होऊ शकतो. याच गणिताचा फायदा घेत 'पाडण्याची' सुपारी घेणाऱ्या टोळ्या सक्रिय झाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. या प्रकारामुळे अकोल्याच्या राजकारणात खळबळ उडाली असून, प्रामाणिकपणे निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. पैशाच्या जोरावर लोकशाहीचा गळा आवळला जात असल्याची भावना सुज्ञ नागरिक व्यक्त करत आहेत. आता निवडणूक आयोग आणि प्रशासन या गुप्त 'ऑफर' प्रकरणावर कशी नजर ठेवणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

## प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजना

# लाभार्थी उपस्थितीची नोंद न केल्यास कारवाई

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**पुणे :** प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेअंतर्गत राज्यातील सर्व पात्र शाळांनी लाभार्थी, उपस्थितीची माहिती सरल प्रणालीवर ऑनलाइन भरणे अनिवार्य आहे. मात्र, अनेक शाळांकडून शाळास्तरावर वितरित केलेल्या आहाराबाबत दैनंदिन लाभार्थी, उपस्थितीची माहिती नियमित, वेळेत भरली जात नसल्याचे निदर्शनास येत आहे.

त्याबाबत केंद्र सरकारने तीव्र नाराजी व्यक्त केली असून, आता शाळांनी दुपारी दोन वाजेपर्यंत लाभार्थी, उपस्थितीची नोंद न केल्यास कारवाई केली जाणार आहे.

प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी यांनी राज्यभरातील अधिकाऱ्यांना परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत. केंद्र सरकार पुरस्कृत प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण योजनेत ग्रामीण आणि शहरी भागातील इयत्ता पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनाचा लाभ देण्यात येतो. योजनेत दिल्या जाणाऱ्या लाभाची दैनंदिन लाभार्थी माहिती राज्यातील सर्व पात्र शाळांनी सरल प्रणालीवर ऑनलाईन भरणे अनिवार्य आहे. सरल प्रणालीवर भरलेली ही दैनंदिन माहिती केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री पोषणशक्ती निर्माण संकेतस्थळावर स्वयंचलितपणे अद्ययावत होते. केंद्र शासनाकडून दररोज ऑटोमेटेड मॉनिटरिंग सिस्टिम (एएमएस) अहवालाद्वारे लाभार्थी शाळांच्या माहितीची पडताळणी करण्यात येते. मात्र, राज्यातील अनेक शाळांकडून उक्त प्रमाणे शाळास्तरावर वितरित केलेल्या आहाराच्या अनुषंगाने दैनंदिन लाभार्थी आणि उपस्थितीची माहिती नियमित, वेळेत भरली जात नसल्याचे निदर्शनास येत आहे. परिणामी, केंद्र शासनाच्या दैनंदिन अहवालामध्ये राज्यातील विद्यार्थी पोषण आहारापासून वंचित असल्याचे चित्र आहे.

# वंचित आणि काँग्रेसच्या आघाडीची शक्यता धुसर

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**अकोला:** मुंबईत वंचित आणि काँग्रेसची आघाडी झाली असली तरी अकोल्यात मात्र या आघाडीची शक्यता धुसर असल्याचे चित्र आहे. अकोल्यात गेल्या पाच दिवसांपासून काँग्रेसकडून केलेल्या प्रयत्नांना वंचितकडून कोणताही ठोस किंवा सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही, ही वस्तुस्थिती समोर आली आहे.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकारण वेगाने बदलत असताना, अकोल्यात मात्र काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडीमधील संभाव्य युती अडचणीत सापडल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. मुंबईत वंचित बहुजन आघाडीने काँग्रेससोबत युतीची घोषणा करून राज्याच्या राजकारणात खळबळ उडवली असली, तरी अकोल्यात गेल्या पाच दिवसांपासून काँग्रेसकडून केलेल्या प्रयत्नांना वंचितकडून कोणताही ठोस किंवा सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही, ही वस्तुस्थिती समोर आली आहे.काँग्रेस आमदार साजिद खान पठाण यांनी वंचित बहुजन आघाडीचे शहर संघटक निलेश देव यांच्याशी थेट संपर्क साधून युतीबाबत चर्चा केली होती. त्यानंतर निलेश देव यांनी हा प्रस्ताव वंचितच्या स्थानिक तसेच राज्य कार्यकारिणीतील पदाधिकाऱ्यांपर्यंत पोहोचवला. म्हणजेच संवादाची प्रक्रिया पूर्णपणे पार पडली असतानाही वंचितच्या वरिष्ठ नेतृत्वाकडून अद्याप अधिकृत भूमिका किंवा प्रतिसाद न मिळणे, हे अकोल्यातील राजकीय समीकरणांसाठी महत्त्वाचे ठरत आहे. दरम्यान, रविवारी संध्याकाळी काँग्रेसने राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) यांच्यासोबत युती करून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका एकत्र लढवण्याचा निर्णय जाहीर केला आहे. त्यामुळे काँग्रेसने अकोल्यात पर्यायी राजकीय मांडणी उभी करण्यास सुरुवात केल्याचे संकेत मिळत आहेत. वंचितकडून प्रतिसाद मिळत नसल्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसने शरद पवार गटासोबत युती निश्चित करणे, ही रणनीतीचा भाग असल्याचे राजकीय जाणकारांचे मत आहे.या घडामोडींवरून असे दिसते की मुंबईतील काँग्रेस-वंचित युतीचा निर्णय राज्यभर तसाच लागू होईल, असा समज अकोल्यात तरी फोल ठरला आहे. वंचित बहुजन आघाडी स्थानिक पातळीवर स्वतंत्र राजकीय भूमिका ठेवण्याच्या मनःस्थितीत आहे की, अधिक अनुकूल अटींची प्रतीक्षा करत आहे, याबाबत स्पष्टता नाही. मात्र, निर्णय लांबवून ठेवणे हीदेखील वंचितची दबावाची राजकीय रणनीती असू शकते, असे मत व्यक्त केले जात आहे.

# भाजपने जवळपास शंभर जणांना एबी फॉर्म वाटले!

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**मुंबई :** मुंबई महापालिका निवडणुकांसाठी भारतीय जनता पक्षाची पहिली यादी समोर आली आहे. ठाकरे गटाची साथ सोडून भाजपवासी झालेल्या तेजस्वी घोसाळकर यांना वॉर्ड क्रमांक दोनमधून तिकीट देण्यात आले आहे. तर माजी खासदार किरीट सोमय्या यांचे सुपुत्र नील, माजी आमदार राज पुरोहित यांचे पुत्र आकाश यांनाही संधी देण्यात आली आहे. याशिवाय काँग्रेसमधून आलेले बीएमसीचे माजी विरोधीपक्ष नेते रवी राजा, भाजपचे माध्यमप्रमुख नवनाथ बन हेसुद्धा रिंगणातील प्रमुख उमेदवार आहेत. जवळपास शंभर जणांना एबी फॉर्मचे वाटप केल्याची माहिती असून त्यापैकी जवळपास ५५ जणांची यादी समोर आली आहे.

# शिवसेना ठाकरे गटाने ९० वाटले एबी फॉर्म!

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**मुंबई :** मुंबई महानगरपालिच्या निवडणुकीसाठी ठाकरेंच्या शिवसेनेने आतापर्यंत कुठलीही यादी जाहीर केलेली नाही. मात्र आतापर्यंत ९० जणांना एबी फॉर्म देण्यात आले आहेत. त्यातील ४२ जणांची नावे समोर आली आहेत.

राज आणि उद्धव ठाकरे या दोन ठाकरे भावांनी २४ डिसेंबर रोजी ऐतिहासिक युतीची घोषणा केली आहे. मुंबईच्या राजकारणात नवी समीकरणे जन्माला आली. आगामी मुंबई महापालिका निवडणुकीत आता 'ठाकरे बंधू विरुद्ध महायुती' असा थेट सामना रंगणार आहे. मुंबई महापालिकेची सत्ता हस्तगत करण्यासाठी ११४ हा बहुमताचा आकडा गाठणे आवश्यक आहे.

# नागपुरात भाजपविरोधात एकत्र लढण्यावर मविआच्या तिन्ही पक्षात एकमत!

## काँग्रेसला झुकतं माप, राष्ट्रवादीला १२ जागा, तर शिवसेनेला अवघ्या १० जागा

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**नागपूर :** राज्यातील महापालिका निवडणुकांच्या अनुषंगाने राजकीय पक्षांमध्ये जोरदार घडामोडी घडत असल्याचे चित्र आहे. तर नेतेमंडळींसह कार्यकर्ते आणि इच्छुक उमेदवारांच्याही अनेक तऱ्हा सर्वसामान्य नागरिकांना पाहायला मिळत आहेत. राज्यातील बहुतांश मतदारसंघातीला जागावाटपाचा निर्णय अंतिम टप्प्यात असल्याचे बोललं जात आहे. अशातच आता नागपूरमध्येही महाविकास आघाडीचे तिन्ही पक्ष एकत्र लढण्यावर जवळपास



एकमत झाल्याची माहिती आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, काँग्रेस १२९, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार ) १२ आणि ठाकरेंच्या शिवसेनेला १० जागा, या सूत्रावर तिन्ही पक्षाच्या स्थानिक नेत्यांनी होकार दर्शवला असल्याची माहिती आहे.

मात्र, या संदर्भात अद्याप कुठलीही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नसल्याचीही माहिती आहे. त्यामुळे सत्तेत असलेल्या भाजप आणि महायुतीला रोखण्यासाठी माविआ काय रणनीती आखते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

### भाजप आणि एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचं सूत जुळलं!

दुसरीकडे, नागपूर महानगर पालिका निवडणुकीत युती किवा आघाडीचे अजून चित्र स्पस्ट नाही. मात्र भाजप आणि एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेच्या युतीची सकारात्मक चर्चा अंतिम टप्प्यात असल्याची माहिती आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या उपस्थित काल झालेल्या बैठकीत संपूर्ण १५१ जागेवर उमेदवारांची नावे निश्चित झाली. यात शिवसेनेच्या वाट्यात जाणाऱ्या जागेवर शिवसेनेनं दिलेल्या नावांवरही चर्चा झाली. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसला अजून चर्चेला पण बोलवले नसल्याने राष्ट्रवादी युतीत असण्याची शक्यात नाममात्र दिसत आहे.

### सन्मानजनक स्थान न मिळाल्यास वंचितसोबत युती?

नागपूरमध्ये भारतीय जनता पक्षाकडून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला युतीसाठी विचारलं जात नसल्याने आता राष्ट्रवादी काँग्रेसने वंचित सोबत चर्चा सुरु केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व वंचित यांची बोलणी सकारात्मक टप्प्यावर असून जागावाटपावर आज परत चर्चा होणार आहे. त्यामुळे महायुतीत सन्मानजनक स्थान न मिळाल्यास नागपुरात राष्ट्रवादी आणि वंचित या पक्षाची युती होण्याची शक्यता आहे.

# भाजप आमदार, खासदारांच्या मुलांना, नातेवाइकांना उमेदवारी देणार नाही!

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**पुणे :** पुणे महापालिकेसाठी भाजपच्या आमदार, खासदारांच्या मुलांना, जवळच्या नातेवाइकांना उमेदवारी न देण्याचा निर्णय भाजपच्या नेतृत्वाने घेतला आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधींना जोरदार झटका बसला आहे, तर कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

गुजरात, दिल्ली पॅटर्नप्रमाणे पुण्यासह महाराष्ट्रात हा निर्णय लागू केला आहे.

पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी भाजपकडून १६५ जागांवर इच्छुक उमेदवारांचे अर्ज मागविण्यात आलेले होते.

### घराणेशाहीला ब्रेक

त्यात २ हजार ३०० पेक्षा जास्त इच्छुकांनी अर्ज सादर केले होते. पक्षांमध्ये प्रचंड स्पर्धा असताना अन्य पक्षातील सुमारे १० माजी नगरसेवकांचा भाजपमध्ये प्रवेश झालेला आहे. त्यामुळे तेथील मूळ भाजपच्या कार्यकर्त्यांना निवडणूक लढविता येणार नाही, अशी स्थिती आहे. त्यातच शहरातील आमदार, खासदारांच्या नातेवाइकांनी उमेदवारी मिळविण्यासाठी फिल्डींग लावली होती. आमदारांनी त्यांच्या मुलांना उमेदवारी मिळावी, यासाठी जोरदार लॉबींग केले.

हे नातेवाईक कोणत्या प्रभागातून लढणार, त्यांच्यासाठी कोणत्या माजी नगरसेवकाची उमेदवारी नाकारायचे, याचेसुद्धा नियोजन झाले होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे झालेल्या बैठकीतही मुलांची व नातेवाइकांच्या उमेदवारीवर चर्चा झाली होती. पण त्यावेळी उमेदवारी मिळणार की नाही याबाबत कोणतीही स्पष्टता देण्यात आलेली नव्हती. पण या बैठकीत विरोध न झाल्याने 'खास' उमेदवारांचे तिकीट फिक्स असल्याचेच चित्र निर्माण झाले होते. शनिवारी रात्री पक्षाच्या नेतृत्वाने हा आदेश पुण्यात कळविल्यानंतर एकच खळबळ उडाली.

CMYK ● ● ● ● CMYK

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती
सोमवार, दि.२९ डिसेंबर २०२५
http://epaper.citynewssuperfast.com

# दोन महिन्यांपासून लाडकी बहीण योजनेचे पैसे थकीत

## ◆सर्व लाडक्या बहिणींचे लक्ष मोबाईल संदेशाकडे ◆ लाडक्या बहिणींची प्रतिक्षा वाढली

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**अमरावती :** राज्यातील लाडकी बहीण योजनेबाबत एक मोठी अपडेट समोर येत आहे. ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करूनही लाडक्या बहिणींच्या खात्यात गेल्या दोन महिन्यांपासून योजनेचे पैसे जमा झालेले नाहीत. मोबाईलवर मेसेजची रिंग वाजताच, बँकेचाच मेसेज असावा अशी आशा महिलांना वाटते, मात्र प्रत्यक्षात पैसे जमा होत नसल्याने महिलांमध्ये आता तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. आगामी महापालिका निवडणुकीत या नाराजीचा मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकीनंतर आता लाडकी बहीण योजनेच्या अनुदानाबाबत उलट-सुलट चर्चा सुरू झाल्या आहेत. यामुळे सर्व लाडक्या



बहिणींचे डोळे मोबाईलच्या संदेशाकडे लागले आहेत. गेल्या वर्षी जुलै महिन्यात राज्य सरकारने सुरू केलेल्या या योजनेमुळे महिलांमध्ये मोठी आशा निर्माण झाली होती. पात्र महिलांच्या खात्यात दरमहा १५०० रुपये जमा होत असल्याने, तालुक्यातील हजारो महिलांना मोठा आर्थिक आधार मिळाला होता.

मात्र, गेल्या एक-दोन महिन्यांपासून योजनेची रक्कम खात्यात जमा न झाल्याने, राज्यातील सर्व लाडक्या बहिणींचे लक्ष सतत मोबाईलवर येणाऱ्या बँकेच्या मेसेजकडे लागले आहे. योजनेच्या सुरुवातीला याला चांगला प्रतिसाद मिळाला होता, पण नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर योजनेच्या अंमलबजावणीसाठी एकामागून एक नवे नियम लागू करण्यात आले. या बदललेल्या नियमांचा थेट फटका लाभार्थी महिलांना बसला आहे. परिणामी, अनेक महिलांना योजनेतून बाहेर काढले गेले, तर काहींचे पैसे येणे बंद झाले.

या सर्व घडामोडींमुळे आता नियमित हप्ता मिळणाऱ्या महिलांनाही 'पुढचा हप्ता नक्की कधी येईल' याबाबत शाश्वती राहिलेली नाही. आज अनेक महिला या आशेवर आहेत की कधीतरी बँकेचा मेसेज येईल आणि पैसे जमा होतील. ग्रामीण आणि शहरी भागात महिलांमध्ये 'हप्ता आला का' अशी विचारणा होताना दिसत आहे. पैसे खात्यात न आल्यामुळे आपले नाव लाभार्थी यादीतून तर कट झाले नाही ना अशी भीतीही महिलांच्या मनात घर करू लागली आहे. विशेष म्हणजे, ई-केवायसी करूनही पैसे मिळत नसल्याने महिला आपली नाराजी उघडपणे व्यक्त करत आहेत.

# अमरावती येथील गजानन महाराज पायदळ वारीचे झाले दर्यापूर स्वागत



भाविकांना दिला महाप्रसाद अकरा वर्षाची परंपरा आजही परंपरा कायम

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**दर्यापूर :** अमरावती येथून गजानन महाराजांची पायदळ वारी शेगाव नगरी करिता निघाली असता तिचे दर्यापूर तालुक्यात आगमन झाले असता साईनगर येथील गजानन पुरी अनिल पुरी पुरी कुटुंबाने त्या पालखीचे भव्य दिव्य स्वागत करण्यात आले ठिकठिकाणी पाणी शिंपडून रांगोळ्यांनी रोड सजवण्यात आले होते महिलांनी गजानन महाराजांच्या पालखीचे दर्शन घेऊन शुभेच्छा दिल्या त्यानंतर आरती करण्यात आली व उपस्थित सर्व गजानन भक्तांना भोजनाचा लाभ घेतला

गजानन महाराजांचे भक्त प्रभाकर पाटील कराड प्राध्यापक दिवाकर देशमुख विजय पाटील अढाऊ यांनी सुद्धा या ठिकाणी भेट दिली गण गण गणात होते गजानन महाराज की जय गजानन श्री गजानन विविध घोषणांनी परिसरात दुमदुमून गेला होता महाप्रसाद घेऊन पालखीचे सांभाळूदला प्रस्थान झाले त्याप्रसंगी अनिल पुरी, गजानन पुरी, अमोल पाटील अरबट, आदी उपस्थित होते.

# पी.आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालया तर्फे शेती शाळेचे आयोजन

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**अमरावती :** येथील पी.आर.पोटे पाटील कृषी महाविद्यालय तर्फे रब्बी पीक उत्पादन तंत्रज्ञान या विषयावर अमरावती तालुक्यातील मौजे शिराळा येथे शेती शाळा व प्रक्षेत्र भेटीचे आयोजन करण्यात आले होते. कृषी महाविद्यालयातर्फे कृषी विद्या विभागाचे प्रा. हेमंतकुमार वि. पवार यांनी शेतकऱ्यांना हरभरा व तूर पिकातील खत व कीड व्यवस्थापन याविषयी शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले तसेच शेतकऱ्यांच्या शेतावर भेट देऊन हरभरा व तूर पिकातील अन्नद्रव्य व्यवस्थापनाबाबत शेतकऱ्यांशी चर्चा केली त्यांच्या शंकांचे निरसन केले. सदर शेती शाळा व प्रक्षेत्र भेटी मधील मार्गदर्शना बाबत उपस्थित शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त करून भविष्यात



देखील पी. आर. पोटे पाटील कृषी महाविद्यालयातर्फे पिक उत्पादन, संरक्षण, काढणी पश्चात तंत्रज्ञान व शेतमालाचे विपणन यासंदर्भात मार्गदर्शन करावे अशी अपेक्षा व्यक्त केली. सदर कार्यक्रमाला मंडळ कृषी अधिकारी सौ. नीता कवाणे , सहाय्यक कृषी अधिकारी श्री. मारुती जाधव, ग्रामपंचायत सदस्य व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समस्या नियमित काम केल्यानंतरही मानधनासाठी निराशाच

## ◆ संगणक परिचालकाचे मानधन रखडले; कुटूंब चालते उसनवारीवर

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**धारणी:** ग्रामपंचायतीत आवश्यक ऑनलाइन सेवा सांभाळणाऱ्या जिल्ह्यातील ६०२ संगणक परिचालकांचे मानधन अनेक महिन्यांपासून रखडले आहे. नियमित काम करूनही त्यांच्या कुटुंबावर उपासमारीची वेळ आली आहे. आधीच तुटपुंजे मानधन, आता तेही मिळत नसल्याने पदरी निराशाच पडत असल्याची खंत संगणक परिचालकांनी दिली.

दरम्यान संगणक परिचालकांचे मानधन हे ग्रामपंचायतींच्या १५ व्या वित्त आयोगामार्फत प्रति महिना याप्रमाणे संपूर्ण वर्षाचे एकत्रितपणे जिल्हा परिषदेला आरटीजीएस जिल्हा परिषदेलाआरटीजीएस प्रणालीद्वारे अदा केले जाते. मात्र, कंपनीकडून



परिचालकांना कमी मानधन दिले जाते. कंत्राटदार काही न करता प्रत्येक संगणक परिचालकांमागे हजारो रुपये कमावतो. महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत संगणक परिचालक संघटनेच्या वतीने मानधन वाढ आणि शासकीय सेवेत नियमितीकरण करण्यासाठी नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात आंदोलन करण्यात आले होते. मात्र, त्याचा फायदा झाला नसल्याचेही समोर आले आहे. शासनाने थकीत असलेल्या संगणक परिचालकांचे मानधन तातडीने अदा करावे, अशी मागणी महाराष्ट्र राज्य संगणक परिचालक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेश कोयरे व महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत संगणक परिचालक संघटनेचे प्रवीण येऊल यांनी केली.

**कंपनीचा करार संपला**

जिल्ह्यात संगणक परिचालक पूर्वी एस टू इन्फोटेक या कंपनीमार्फत पाच वर्षे कामाला होते. त्यानंतर मफतलाल कंपनीने काम केले. अलीकडे रेलटेल कंपनीचाही करार संपला. आता लेखी पत्रावर काम सुरू आहे.

**अडव्हान्स रक्कम घेतली तरीही पगार मिळेना**

संगणक परिचालकांच्या मानधनासाठी १५ व्या वित्त आयोगातून लाखो रुपयांचा ॲडव्हास घेतला. तो निधी जिल्हा परिषदेकडून राष्ट्रीय ग्रामीण स्वराज्य अभियानाकडे वर्ग केला जातो. तेथून संगणक परिचालकांना मानधन अदा केले जाते. मात्र, मानधन मिळालेले नाही..

**१० हजार मानधन.... पण मिळते किती ?**

संगणक परिचालकांना महिन्याला १० हजार रुपये मानधन दिले जाते. मात्र, तेही मागील सहा महिन्यांपासून न मिळाल्याने परिचालकांना आर्थिक चणचणीला सामोरे जावे लागत आहे. १० हजार मानधन असताना ३ विविध कारणामुळे मानधनात कपात केली जात असल्याचा आरोप परिचालकांनी केला. विविध आंदोलने करूनही समस्यांची दखल घेतली जात नसल्याची खंत व्यक्त होत आहे.

# विश्वमांगल्य सभा अमरावती मार्फत समकालीन मातृत्व या विषयावरील परिसंवाद संपन्न

## ◆ मातृत्वाचे समकालीन परिमाण, आव्हाने आणि समाजाची भूमिका यावर चर्चा

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**अमरावती :**विश्वमांगल्य सभा, ही राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर सक्रिय महिला संघटना असुन, गेल्या १५ वर्षांपासून अर्थपूर्ण, मूल्य-आधारित आणि सामाजिकदृष्ट्या फायदेशीर कार्यात सतत गुंतलेली आहे. 'मातृ-निर्माण' ही संकल्पना गाभ्याला घेऊन, सभा विविध वयोगटातील आणि विविध व्यावसायिक पार्श्वभूमीच्या महिलांपर्यंत पोहोचण्यासाठी पद्धतशीर पुढाकार घेत आहे. याच श्रृखंलेतुन दिनांक २५ डिसेंबर रोजी मणिबाई गुजराती हायस्कूलच्या सभागृहात मातृत्वाचे बदलते स्वरूप, सध्याची आव्हाने आणि सामाजिक जबाबदाऱ्या यावर चर्चा करण्यासाठी परिसंवाद आयोजित करण्यात आले होते. यामध्ये अधिवक्ता, प्राध्यापक, डॉक्टर आणि उद्योजकांसह एकूण ६७ महिलांनी भाग घेतला. परीसंवादचे अध्यक्षपद विश्वमांगल्य सभेच्या राष्ट्रीय सह-संघटन मंत्री डॉ. पूजा देशमुख यांनी भूषवले. अखिल भारतीय बाल सभेच्या सह-संघटक अंजली देव, विदर्भ प्रांत संघटक पूजा चव्हाण, विदर्भ प्रांत संपर्क प्रमुख डॉ. वसुधा



बोंडे, विदर्भ प्रांत विद्यार्थी सभा अध्यक्षा डॉ. स्मिता देशमुख आणि विदर्भ प्रांत उपाध्यक्षा रश्मी जाजोदिया यांच्या उपस्थितीत परिसंवाद संपन्न झाले. कार्यक्रमाची सुरुवात दिप प्रज्वलन आणि तुळशी पुजनाने करण्यात आली. त्यानंतर सीमा पेलागडे आणि माधुरी जोशी यांनी शक्तिगान सादर केले. विश्वमांगल्य सभेच्या विदर्भ प्रांत संघटिका पूजा चव्हाण यांनी विश्वमांगल्य सभेकडून केले जाणारे कार्य, विभाग आणि संघटनेचे उद्दिष्टे तसेच आगामी २८ व २९ मार्च रोजी शेगांव येथे होणाऱ्या विदर्भ प्रांत अधिवेशनाची माहिती दिली.

डॉ. पूजा देशमुख यांनी 'युगानूकुल मातृत्व' या विषयावर प्रेक्षकांशी चर्चा केली. आजच्या महिलांना काम आणि कुटुंबाचे संतुलन साधताना अनेक आव्हानांना तोंड द्यावे लागते, परंतु त्या अहिल्याबाई आणि माता जिजाऊं इतक्याच सक्षम आहेत. सभेच्या भविष्यातील दृष्टिकोन आणि धोरणात्मक अंमलबजावणी वरही चर्चा झाली. छोटा परिवार सुखी परिवार हे विमर्श बाजूला सारत त्यांनी बडा परिवार समृध्द परिवार हा मूलमंत्र दिला. महिला भारताच्या लोकसंख्येचा अर्धा भाग आहे, मातृत्वाच्या सक्षमीकरणात त्यांना सहभागी करून घेणे आणि मूल्यांवर आधारित, सुसंस्कृत आणि सुसंवादी समाज निर्माण करण्यात महिलांची भूमिका बळकट करणे ही काळाची गरज असल्याचे डॉ. पूजा देशमुख यांनी सांगितले.

या शुभ प्रसंगी, डॉ. पूजा देशमुख यांनी पीएच.डी. पदवी यशस्वीरित्या पूर्ण केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. परिसंवादचे संचालन विश्वमांगल्य सभा, अमरावती बाल-सभा समन्वयक सिद्धी सेठिया यांनी केले. माधुरी जोशी यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विदर्भ प्रांत कार्यालय प्रमुख रश्मी इटकीकर, प्रकल्प प्रमुख सुनिता बालेकर, अमरावती महानगर संपर्क प्रमुख निकिता शुक्ला, अमरावती महानगर संयोजिका श्रुती बिरे, सहसचिव हितेष्णी देवरणकर, सह प्रकल्प प्रमुख माधुरी जोशी, विदर्भ प्रांत बालसभा संयोजिका सीमा पेलागडे, कल्पना देशमुख, अस्मिता बालेकर, शिवानी चौधरी, सविता पांडे, रेवती देशपांडे, मनीषा देशपांडे, अनुराधा रघुवंशी, रोहिणी डोरले व विश्वमांगल्य सभेच्या समस्त महिला शक्तीने अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाची सांगता जयघोषाने झाली. दिनांक २८ व २९ मार्च रोजी होणाऱ्या विश्वमांगल्य सभा विदर्भ प्रांत अधिवेशनाचा जास्तीत जास्त महिलांनी लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले.

# स्व. माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेचे आयोजन

## ◆ भारताच्या विकास प्रक्रियेत तरुणांचे प्रश्न दुर्लक्षित झाले आहेत, या विषयावर होणार वैचारिक दंगल

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**अमरावती:** स्व. माणिकराव घवळे स्मृती प्रतिष्ठान आणि डॉ. पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. माणिकराव घवळे स्मृती राज्यस्तरीय वादविवाद स्पर्धेचे आयोजन सोमवार,दि.५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १०.३० वाजता डॉ.पंजाबराव देशमुख विधी महाविद्यालय अमरावती येथे करण्यात आले आहे. शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती उत्सव निमित्ताने आयोजित ही स्पर्धा 'भारताच्या विकास प्रक्रियेत तरुणांचे प्रश्न दुर्लक्षित झाले आहेत' या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर रंगणार आहे. स्पर्धेत विषयाच्या अनुकूल व प्रतिकूल अशा दोन्ही बाजूंनी विचार मांडणारे महाविद्यालयीन संघ सहभागी होऊ शकणार आहेत. स्पर्धेचे थेट प्रक्षेपण फेसबुक व युट्यूबच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. महाविद्यालयीन स्तरावरील प्रथम क्रमांकाच्या चमूला रु. ११,००१ रोख रक्कम व फिरता सुवर्ण चषक प्रदान करण्यात येणार आहे.



तसेच स्पर्धेतील विजेत्या वादविवादपटूंना रोख पारितोषिके, सन्मानचिन्हे व प्रमाणपत्रे देऊन गौरविण्यात येणार आहे. वैयक्तिक पारितोषिकांमध्ये प्रथम क्रमांकासाठी रु. ७,००१ रोख, द्वितीय क्रमांकासाठी रु. ५,००१ रोख, तर तृतीय क्रमांकासाठी रु. ३,००१ रोख रक्कम तसेच सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. या स्पर्धेसाठी विदर्भ, मराठवाडा व पश्चिम महाराष्ट्रातील नामवंत व अनुभवी वादविवादपटू परीक्षक म्हणून उपस्थित राहणार आहेत. अधिकाधिक विद्यार्थ्यांनी या राज्यस्तरीय स्पर्धेत सहभाग घ्यावा, असे आवाहन प्राचार्य डॉ .वर्षा देशमुख तसेच आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.अधिक माहितीसाठी प्रफुल्ल घवळे,९३७०१०४२९३,डॉ. शितल बाबू तायडे – ९८२३९३८०८८,डॉ.अमित गावंडे – ९४२२३४३२९८ प्रा. रणजित देशमुख ९९६७६९८५८६,मयूर चौधरी – ७६७६०८०४००,रत्नाकर शिरसाट – ८८४९११३०३६ यांच्याशी संपर्क करावा असे संयोजकांच्या वतीने कळविण्यात आले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट

## खामगाव

# रेशन दुकानातील निकृष्ट ज्वारी घेण्यास ग्राहकांचा नकार



प्रतिनिधी २९ डिसेंबर

**खामगाव :** तालुक्यात मागील ६ ते ७ महिन्यापासून कार्डधारकांना गव्हा ऐवजी ज्वारी वाटप सुरु असून, त्यासोबत मिळणारा तांदुळ सुद्धा चुरी असलेला व खाण्यास अयोग्य असल्याची ग्राहकांची ओरड आहे. या निकृष्ट धान्याची उचल करण्यास कार्ड धारक नकार देत असून त्यांना नाईलाजाने फुकट धान्य मिळते म्हणून तसेच सतत धान्य उचल न केल्यास रेशन कार्ड बंद होईल या धाके मुळे कार्डधारक धान्य घरी नेतात व गुराढोरांना खाऊ लागतात तर अनेक नागरिक गावातच फेरीवाल्यांना विकून मोकळे होतात, अशी परिस्थिती ग्रामीण व शहरी भागात सध्या दिसत असून निकृष्ट धान्य मिळत असल्याची ओरड नागरिकांमधून होत आहे.सध्या स्थितीत शासनाकडून स्वस्त धान्य दुकानांमधून कार्डधारकांना ज्वारी व तांदुळ या धान्याचे वाटप सुरु आहे.

# उसरा–चालठाणा जाणारी बस वेळेवरच पाठवा...!

## ◆ आगार प्रमुख यांच्याकडे विद्यार्थ्यांसह पालकांची मागणी...!

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**खामगाव :** जळगाव जामोद बस स्थानका अंतर्गत मौजे उसरा-चालठाणा जाणाऱ्या बसचा वेळ सा.५.०० वाजता निश्चीत असुन ती बस कधीच वेळेवर लागत नसल्यामुळे शाळेकरी विदयार्थ्यांना विशेषतः मुलींना घरी पोहचण्यास मोठा त्रास होत आहे ज्यामुळे पालकांची चिंता वाढली असुन विदयार्थ्यांना मानसीक व शारिरीक त्रास सहन करावा लागत आहे ही बाब लक्षात घेता जळगाव जामोद आगाराने उसरा-चालठाणा ही बस त्वरीत शाळेच्या वेळ पाहून पाठवावी तसेच विदयार्थ्यांना रात्र होण्याच्या आतच त्यांच्या घरी पोहचता यावे याकरिता आपण बसचे नियोजन करून नियमीत बस सूरु ठेवावी तसेच दर शनिवार ला उसरा-चालठाणा फाट्यावर बस थांबत नसल्यामुळे विदयार्थ्यांना वेळेवर शाळेत जाता येत नाही परिणामी काही विदयार्थ्यांना खाजगी वाहनाने जिवघेणा प्रवास करावा लागत आहे याचा परिणाम विदयार्थ्यांच्या शिक्षणावर होत आहे.सदर मागण्या ह्या रास्त असुन विदयार्थ्यांच्या न्याय हक्काच्या आहेत त्यामुळे त्या तात्काळ मान्य करून पालक व विदयार्थ्यांना सहकार्य करावे अन्यथा पालकांना सोबत घेवुन तिव्र आंदोलन करण्यात येइल याची नोंद आगाराने घ्यावी असा ईशारा युवा आंदोलक अक्षय पाटील यांच्या वतीने देण्यात आला. यावेळी अनीलसींह राजपुत,अजय गिरी,आकाश आटोळे,सै.शाहाबुददीन सै.तमीजोददीन ,सोपान पाटील, सै.रियासोददीन सै.महेबबु, त्रिलोकसिंह राजपुत,गजानन व्यवहारे आदेश निंबाळकर तसेच बहुसंख्येने लोक उपस्थित होते.

# मकर संक्रांतीच्या निमित्ताने पतंगांना मागणी



प्रतिनिधी २९ डिसेंबर

**खामगाव :** मकर संक्रांतीच्या दिवशी शहरात लहान मुले पतंग उडवताना दिसतात, त्याचप्रमाणे येथील मोची गल्लीतही पतंगाची दुकाने थाटली आहेत. शहरातील महावीर चौक, गांधी चौक, मोची गल्ली आदी ठिकाणी पतंगांची दुकाने सजली आहेत. जिथे मुले पतंग घेताना दिसतात. दरवर्षी मकर संक्रांतीच्या पंधरा दिवस आधी पतंगाची दुकाने सजलेली दिसतात, मात्र यंदा पतंगाची दुकाने महिनाभर आधीच सजली आहेत. नागपूर, अमरावती, अकोला आणि इंदूर येथील व्यापारी पतंग आणि त्यांना उडवन्या करता मांजा विकण्यासाठी आणतात. विजेच्या तारेवर अडकलेला पतंग काढणे जीवघेणे ठरू शकते, वायरमध्ये अडकलेली पंतग ओढू नका, मिश्रित तार ही वीजवाहक असते. विजेच्या तारा असलेल्या परिसरात पतंग उडवणे टाळा, तारेमध्ये अडकलेला पतंग काढण्यासाठी तारेला दोरीने बांधलेला दगड फेकू नका, पतंग उडवणाऱ्या मुलांकडे पालकांनी लक्ष देण्याची गरज आहे.

सिटी न्यूज अकोला

सोमवार, दि.२९ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com

# ६ वी राष्ट्रीय कराटे स्पर्धेत अकोल्यातील खेळाडूंना गोल्ड मेडल

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**अकोला:** २६ ते २७ डिसेंबर २०२५ रोजी हॉटेल रेडिशन ब्लु फरीदाबाद दिल्ली येथे ६वी राष्ट्रीय कराटे स्पर्धेचे आयोजन ऱ्ख्ड्घ कराटे डो फेडरेशन ऑफ इडिया नी केले होते.या स्पर्धामध्ये भारतातुन अनेक कराटे खेळाडुनी सहभाग नोदविले होते या मध्ये महाराष्ट्र टिम मध्ये अकोलाचे कुमिते खेळ प्रकार मध्ये गोल्ड मेडल श्रीया बोडके, संजना सतरोटे,साक्षी ब्राम्हणे, निमिती सयाम, वेदिका जयभाये, समिक्षा घातांगे, सिद्धी राजाध्यक्ष,सिल्वर मेडल तनिष्का बोदळे, आराध्य चिंचोलकार,आदेश इंगळे,स्वराज पावसाळे,स्वानंदी ब्राम्हणकर, मृणाली वासेकर, नैनिशा कोनिनैनी, शौर्य मेश्राम. मनशाद उस्ताद,ब्रॉझ मेडल यर्थात टेकाडे. श्रृतिका पाटील,तसेच काता खेळ प्रकार मध्ये गोल्ड मेडल स्वानंदी ब्राह्मणकर, यांना मिळाले.

## जानकीबाई डिजिटल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न



प्रतिनिधी २९ डिसेंबर

**अकोला:** बाल विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना उजाळा देण्यासाठी अनेक नव उपक्रम राबविणाऱ्या जानकीबाई डिजिटल स्कूलचे वार्षिक स्नेहसंमेलन व क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यात जेसीईडी स्कूल व ना.मा. चौधरी शाळेच्या संघात स्पर्धा घेण्यात आल्यात. कबड्डी, डाचबॉल व अन्य खेळात जेसीईडी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी बाजी मारीत प्रथम पारितोषिक पटकावले. महोत्सवात द्वितीय दिनी शालेय विद्यार्थ्यांच्या स्कीपिंग, रनिंग, खो-खो, कबड्डी, बॅडमिंटन, क्रिकेट, रस्सीखेच, डॉजबॉल, संगीत खुर्ची व अन्य खेळांच्या स्पर्धा संपन्न झाल्यात.

# शेतातील कापूस चोरी करणारी टोळी; ग्रामीण पोलिसांकडून गजाआड

वि. प्रतिनिधी २९ डिसेंबर

**अकोट:** ऑपरेशन प्रहार अंतर्गत अकोट ग्रामीण पोलिसांनी शेतातून कापूस चोरी करणाऱ्या दोन आरोपींना अटक करून मोठी कारवाई केली आहे. ही कारवाई २८ डिसेंबरला रात्री करण्यात आली.

पोलिस स्टेशन ग्रामीणचे रात्रपाळी अधिकारी पो.हवालदार वासुदेव ठोसरे हे दर्यापूर रोडवरील अकोट भाग-२ बी परिसरात गस्त घालत असताना दुचाकीवर कापसाची गाठोडी घेऊन जाणारे दोन संशयित इसम आढळले. त्यांना थांबण्याचा इशारा दिला असता त्यांनी तो न जुमानता पळ काढण्याचा प्रयत्न केला. संशय बळावल्याने पोलिसांनी त्यांना थांबवून चौकशी केली असता त्यांनी आपली नावे दीपक सुरेश गवते (२०) व राजेश पन्नालाल कासदेकर (२३) रा. चिपी गायराण, ता. तेल्हारा, जि. अकोला अशी सांगितली.

रात्री उशिरा अकोट-अमरावती रोडवर





कापसाची गाठोडी घेऊन जाण्याबाबत समाधानकारक उत्तरे न दिल्याने पोलिसांना खात्री झाली की, सदर कापूस चोरीचा आहे. त्यानुसार दोन्ही संशयितांना चौकशीसाठी पोलीस ठाणे अकोट ग्रामीण येथे आणण्यात आले.

दरम्यान, अब्दुल सलीम अब्दुल रफिक (वय २८), रा. सोमवार वेस, खतीब पुरा, अकोट हे शेतकरी सकाळी पोलीस ठाण्यात हजर होऊन त्यांच्या शेतातून अज्ञात इसमांनी कापूस चोरी केल्याची तक्रार दिली. पोलीस ठाण्यात उभी असलेली दुचाकी क्र. एमएच ३० टी ४५०० व त्यावरील कापसाची गाठोडी पाहून त्यांनी खात्री केली की, हाच कापूस त्यांच्या शेतातून चोरीला गेला आहे.

पोलिस, फिर्यादी व आरोपी मिळून शेतात पाहणी केली असता अंदाजे १ क्विंटल कापूस (किंमत सुमारे ८,००० रुपये) चोरी झाल्याचे स्पष्ट झाले. यावेळी आरोपींनी सदर कापूस याच शेतातून चोरी केल्याची कबुली दिली. फिर्यादीच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

या कारवाईत आरोपींकडून गुन्ह्यात वापरलेली दुचाकी व कापूस असा एकूण ५८,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या आदेशान्वये, अप्पर पोलीस अधीक्षक चंद्रकांत बी. रेड्डी व सहाय्यक पोलीस अधीक्षक निखील पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत ठाणेदार किशोर जुनघरे, पोउपनि मिनाक्षी काटोले, पो.हे.कॉ. वासुदेव ठोसरे, पो.हे.कॉ. निलेश खंडारे, पो.हे.कॉ. विठ्ठल चव्हाण, पो.हे.कॉ. आठवले, पोशी गोपाल जाधव व पोशी पांडव यांचा सहभाग होता.

शेतकऱ्यांमध्ये वाढत असलेल्या चोरीच्या घटनांवर अंकुश ठेवण्यासाठी अकोट ग्रामीण पोलिसांची ही कारवाई महत्त्वाची मानली जात आहे.

# कुटासा जिप मराठी शाळेत शिक्षण परिषद



प्रतिनिधी २८ डिसेंबर

**कुटासा:** वरुर केंद्राअंतर्गत जि प. प्राथमिक मराठी शाळेत शिक्षकांची शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.या मध्ये तालुक्यातील जिल्हा परिषद मराठी शाळेतील शिक्षकांनी मोठ्या प्रमाणात सहभाग घेतला होता.या परिषदेमध्ये शिक्षकांच्या विविध समस्या व अडचणी संदर्भात तज्ञ मार्गदर्शकांनी व शिक्षकांनी मार्गदर्शन केले. त्यामध्ये विद्यार्थी सुरक्षा, आरोग्य, समग्र शिक्षा कार्ड, टार्गेट पिक अँप या व इतर विषयावर चर्चा करून शिक्षकांचे समाधान करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक मधुकर बल्ले, शाळा व्यवस्थापन समिती च्या अध्यक्षा सौ. रामदुलारी केवट, शाम हिंगणकर, प्रकाश पानझाडे, सुरेश वहीले, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विध्यार्थी यांची उपस्थिती होती.

## शोभा अग्रवाल यांचे मरणोत्तर नेत्रदान

**अकोला:** महानगरात सन २०१४ पासून मरणोत्तर नेत्रदान साठी सेवारत रोटरी नेत्रदान केंद्राच्या वतीने शुक्रवारी मरणोत्तर नेत्रदान करण्यात आले. स्थानीय वृंदावन नगर येथील रहिवासी शोभा संतोष अग्रवाल यांचे बुधवार दि २४ डिसेंबर रोजी निधन झाले.त्या ७० वर्षांचे होते.त्यांनी मरणोत्तर नेत्रदानाचा संकल्प केला होता. त्यांचा हा संकल्प सर्वेश अग्रवाल यांनी पूर्ण केला.त्यांनी मृतकाचे नेत्र गोलक संकलित करण्यासाठी रोटरी नेत्रदान केंद्राचे प्रमुख डॉ जुगल चिरानिया यांना निमंत्रित केले.

# प्रभात फेरी व व्यवसाय शिक्षण दिंडी उत्साहात



प्रतिनिधी २९ डिसेंबर

**तेल्हारा :** प्रतिनिधी तेल्हारा येथील डॉ. गोपाळराव खेडकर महाविद्यालय व श्री शिवाजी विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती उत्सवानिमित्त तेल्हारा शहरात शानदार प्रभातफेरी व व्यवसाय शिक्षण दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. सर्वप्रथम डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करून सजवलेल्या पालखीतून डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली. याप्रसंगी संस्थेचे ॲड. विश्वासराव नेरकर, बाळासाहेब मार्के, साहेबराव सोनमाळे, रमेशचंद्र कोकाटे, सुधाकरराव येवले, भय्यासाहेब देशमुख, प्राचार्य डॉ. गोपाल ढोले, मुख्याध्यापक गावंडे व प्रभारी प्राध्यापक प्रशांत गेबड व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व श्री शिवाजी विद्यालय येथील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. प्रभात फेरीत राजमाता जिजाऊ, डॉ. पंजाबराव देशमुख, सावित्रीबाई फुले यांचा देखावा तयार करण्यात आला होता. प्रभात फेरीमध्ये शिवाजी विद्यालयाच्या लेझीम पथकाने सुंदर नृत्य सादर केले. ही प्रभातफेरी शिवाजी विद्यालय येथून निघाली आणि तेल्हारा शहरातील मुख्य रस्त्यावरून मार्गस्थ झाली. याप्रसंगी पूर्ण तेल्हारा शहर डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या जयघोषाने दुमदुमून गेले होते. प्रभात फेरीच्या यशस्वितेसाठी प्रा. डॉ. कृष्णा माहुरे व शांतशील सावरकर यांनी सहभाग घेतला.

# उज्वल पब्लिक स्कूलमध्ये साजरा झाला स्नेह, संस्कृती आणि गौरवाचा सोहळा

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**बोरगाव मंजू:** उज्वल पब्लिक स्कूल येथे वार्षिक स्नेहसंमेलनाचा सांस्कृतिक सोहळा विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा, शिक्षकांच्या परिश्रमांचा आणि पालकांच्या प्रेमाचा सुंदर संगम होता.

कार्यक्रमाचे उद्घाटन उपजिल्हाधिकारी राहुल तायडे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी संस्थेच्या संस्थापक सौ. सुशिलाताई मनोहरराव सोनोने होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून कलावंत संदीप पाचंगे, डीवायएसपी शेळके, सरपंच सौ. अनिता सुमित खेडेकर, पोलिस निरीक्षक अनिल गोपाळ उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. विद्यार्थ्यांनी नृत्य, नाट्य, गायन, वादन अशा विविध कलाप्रकारांतून उपस्थितांची मने जिंकली. लहान मुलांनी सादर



केलेल्या देशभक्तिपर नृत्यांनी उपस्थितांना भारावून टाकले. प्रत्येक सादरीकरणात विद्यार्थ्यांची मेहनत, आत्मविश्वास आणि शिक्षकांनी दिलेले मार्गदर्शन स्पष्टपणे जाणवत होते.

गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांचा सत्कार आणि विविध स्पर्धांतील विजेत्यांना बक्षिसांचे वितरण करताना उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले. पालकांनीही मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपल्या मुलांच्या यशाचा आनंद साजरा केला. त्यांच्या टाळ्यांच्या गजरात विद्यार्थ्यांचे आत्मविश्वास द्विगुणित झाला. प्रमुख अतिथी महावितरणचे अधीक्षक अभियंता दीपक सोनवणे व आशुतोष वागडकर आयआयटी इंजिनियर, सुनील खेडकर व सुहास सोनोनें (ग्रा.पं. सदस्य यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन नायब तहसीलदार नरेंद्र सोनोनें बोरगावकर, प्राचार्य सौ. उज्ज्वल नरेंद्र सोनोनें, सचिव वासुदेव व्र. वाघडकर, प्रशासकीय अधिकारी सौ. निता राजेंद्र बोचडे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी केले.

# स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी केली कृषी प्रदर्शनाची पाहणी



प्रतिनिधी २९ डिसेंबर

**अकोला:** डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात सुरू असलेल्या ॲग्रोटेक २०२५ कृषी महोत्सव प्रदर्शनीला तुकाराम चौकातील स्वामी विवेकानंद प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या विद्यार्थी व शिक्षकांनी भेट देऊन शेतीतील नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती घेतली.

ज्यामध्ये आधुनिक शेती, शाश्वत शेती व शेतीपूरक व्यवसाय याची माहिती विद्यार्थ्यांना उपस्थित स्टॉल धारकांनी तथा कृषी विद्यापीठाचे अधिकाऱ्यांनी दिली.

यावेळी स्वामी विवेकानंद प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापिका मनीष उंबरकर व अविनाश मते यांच्यासह सोनाली मानकर, आशा डाबेराव, पद्मावती लंगोटे, हर्षा सोळंके, मनीष गावंडे, मनोज बनसोड उपस्थित होते.

## निधन वार्ता

### रत्नाबाई लोडम



**अकोट:** तालुक्यातील लहान महागाव येथील भवानी देवी संस्थानचे विश्वस्त बाळासाहेब लोडम यांच्या मातोश्री रत्नाबाई लोडम ८५ यांचे २१ डिसेंबरला वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात एक मुलगा, मुलगी असा आप्तपरिवार आहे.

# तेल्हारा पोलिस प्रशासनाचे डोळे कधी उघडणार?

**चायनीज मांजा विक्री जोरात; कागदी घोडे नाचवू नका!**

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**तेल्हारा:** मकर संक्रांतीचा सण जसा जवळ येतोय, तसा तेल्हारा शहरात छुप्या पद्धतीने 'चायनीज मांजा'ची विक्री सुरू झाली आहे. या घातक मांज्यामुळे लोकांचे गळे कापले जात आहेत, पक्षी मरत आहेत. मात्र, तेल्हारा पोलीस आणि नगर परिषद प्रशासन केवळ औपचारिकता म्हणून नोटीस काढण्यात मग्न आहे. 'पोलिसांनी आता हप्तेखोरी किंवा खाबुगिरी बाजूला सारून, प्रत्यक्ष दुकानांमध्ये छापे टाकून गुन्हेगारांना जेलची हवा दाखवावी,' अशी संतप्त मागणी सामान्य नागरिकांकडून होत आहे.

आता जुने कायदे बदलले असून 'भारतीय न्याय संहिता' लागू झाली आहे. चायनीज मांजा बाळगणाऱ्या आणि विकणाऱ्यांवर खालील कलमांनुसार गुन्हे दाखल होऊ शकतात. बीएनएस कलम १२५ (पूर्वीचे IPC ३३६): इतरांचे जीवन किंवा वैयक्तिक सुरक्षितता धोक्यात आणणारे कृत्य करणे. यामध्ये कारावास आणि दंडाची तरतूद आहे. कलम १०६ (१) (निष्काळजीपणामुळे मृत्यू): जर मांजामुळे कोणाचा मृत्यू झाला, तर सदोष मनुष्यवधाच्या संदर्भात कठोर कारवाई होऊ शकते.

पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ (कलम १५): चायनीज मांजावर राष्ट्रीय हरित लवाद (NGT) ने पूर्णपणे बंदी घातली आहे. या कायद्याचे उल्लंघन केल्यास ५ वर्षांपर्यंत तुरुंगवास आणि १ लाख रुपयांपर्यंत दंड होऊ शकतो. प्राणी छळ प्रतिबंधक कायदा: पक्ष्यांना इजा पोहचवल्याबद्दल या कायद्यांतर्गत स्वतंत्र गुन्हा नोंदवला जाऊ शकतो. तालुक्यातील मुख्य बाजारपेठ, आणि ग्रामीण भागातील किराणा दुकानांमध्ये हा मांजा सहज उपलब्ध होत असल्याची चर्चा आहे. पोलिसांचे खबऱ्यांचे जाळे काय करत आहे? एखादा बळी गेल्यावरच पोलीस जागे होणार का? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे. 'दोन-पाच हजारांच्या दंडावर गुन्हेगारांना सोडण्यापेक्षा, त्यांच्यावर थेट अजामीनपात्र कलमे लावून कारवाई का केली जात नाही?'

# मंडळाच्या उपक्रमातून सामाजिक बांधिलकीची जोपासना-ॲड. आकाश फुंडकर









**कलाल समाज मंडळाचा कार्यक्रम**

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**अकोला:** कलाल समाज मंडळाने सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांच्या माध्यमातून समाजासाठी आदर्शवत कार्य उभे केले आहे. समाजातील प्रेरणादायी कार्य करणाऱ्या सेवाव्रतींचा सन्मान त्यांचे आयुष्य महत्त्वपूर्ण संदेश देणारे आहे, असे प्रतिपादन राज्याचे कामगार मंत्री तथा पालकमंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी आज केले.

ते अकोला जिल्हा कलाल समाज मंडळ, द्वारा आयोजित कलाल समाज मेळाव्यात बोलत होते.यावेळी खासदार अनुप धोत्रे,शल्य चिकित्सक, अमरावती डॉ.आशिष डगवार,भागवताचार्य श्री ज्ञानेश्वर महाराज वाघ,केंद्रीय कलाल समिती अध्यक्ष सुनिल खराटे,उद्योजक राजेंद्र जयस्वाल,केंद्रीय कलाल महिला समिती अध्यक्षा सुनिताताई बावनेर, विजय लोहकपुरे, भैय्यासाहेब उजवणे कलाल समाज मंडळ पदाधिकारी,सदस्य समाज बांधव उपस्थित होते. पालकमंत्री श्री.फुंडकर म्हणाले की, समाजातील युवकांनी नवीन काळाची पावले ओळखून आधुनिक शिक्षण, उद्योग आणि व्यवसायाकडे वाटचाल करावी.समाज मेळाव्याच्या माध्यमातून सुसंवाद साधला जातो त्यामुळे अशा प्रकारचे मेळावे होणे गरजेचे आहेत. मेळाव्यात समाजातील ज्येष्ठ सेवाव्रती, उद्योजक, अधिकारी, गुणवंत विद्यार्थी यांच्यासह विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना सन्मानित करण्यात आले.

# गुरु-शिष्य नात्याचा साक्षीदार ठरलेला न्यू ईरा हायस्कूलचा ऐतिहासिक स्नेहमिलन सोहळा

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**अकोला :** न्यू ईरा हायस्कूल येथे माजी विद्यार्थ्यांचा ऐतिहासिक स्नेहमिलन सोहळा २७ डिसेंबर रोजी अत्यंत उत्साहाने पार पडला. अनेक दशकांपूर्वीच्या आठवणींना उजाळा देणाऱ्या या सोहळ्याने उपस्थितांच्या मनावर कायमचा ठसा उमटविला.

१९४२ साली स्थापन झालेल्या या शाळेतील १९६० ते २०१५ या कालावधीतील सुमारे १२०० माजी व विद्यमान विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी एकाच छताखाली एकत्र आले. देश-विदेशातून आलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीमुळे या स्नेहमिलनाला ऐतिहासिक स्वरूप प्राप्त झाले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. विश्वनाथ (मोहन) गद्रे, अध्यक्ष – प्रागतिक शिक्षण प्रसारक मंडळ, अकोला होते. उद्घाटक म्हणून चारू माहुलकर, तर प्रमुख अतिथी म्हणून ब्रिगेडियर सुहास मधुकर कुळकर्णी (निवृत्त) उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक महेश ठोके, जयंत मराठे, माजी विद्यार्थी मेळावा समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या प्रार्थनेने झाली. त्यानंतर प्रतिज्ञा, राष्ट्रगीत,



संविधानाची उद्देशिका व महाराष्ट्र राज्यगीत सादर करण्यात आले. ही सर्व गीते माजी विद्यार्थिनी जयस्वाल भगिनींनी सादर केली. यानंतर दिवंगत शिक्षक व विद्यार्थ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

प्रास्ताविक महेश ठोके यांनी केले. सागर लोडम संपादित 'ईर्षा' या स्मरणिकेचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. प्रमुख अतिथी ब्रिगेडियर सुहास कुळकर्णी यांनी ङ्गभारताचा प्रत्येक नागरिक हा देशासाठी सैनिकासारखा सदैव सज्ज असावा,ङ्ग असा प्रेरणादायी संदेश दिला. प्रा. विश्वनाथ गद्रे यांनी शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी नवीन इमारतीच्या बांधकामास लवकरच सुरुवात होणार असल्याची घोषणा केली. तसेच माजी विद्यार्थ्यांनी शाळेशी सातत्याने संपर्क ठेवून शाळेच्या प्रगतीसाठी योगदान द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. विविध सांस्कृतिक व औपचारिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळाली. गुणवंत तसेच विविध क्षेत्रांत विशेष पुरस्कार प्राप्त केलेल्या माजी विद्यार्थ्यांचा यावेळी गौरव करण्यात आला. लवकरच इंटरनॅशनल बुक ऑफ रेकॉर्ड्स, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स व आशिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद होणाऱ्या या उपक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे सचिन देशमुख यांनी आभार मानले. १९९३ बॅचच्या विद्यार्थ्यांनी स्वच्छतेचा प्रभावी संदेश दिला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सुभाष गोरे, राजेश जोशी, राजेश जोध, विनित आसोलकर, संदीप बाहेती, राजेश चौबे, सुनील नंद, योगेश आगरकर, प्रशांत चिंचोलकर, सुनील चव्हाण, रवी कुलट, दिनेश जोशी, राजू बुडखले, मनोज मेंढे व सिद्धार्थ मेश्राम, सागर लोडम, राजेश बडोदेकर, संदीप ठाकुर आणि सचिन देशमुख यांनी परिश्रम घेतले.

सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला शहरात उपलब्ध आहे

परळीकर न्यूजपेपर एजन्सी — डाबकी रोड 9766005335

अरुण गुजर बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9423429605

येळणे बुक स्टॉल — नविन बस स्थानक 9028947634

वाडेकर बुक स्टॉल — जुने बस स्टँड 9921940878

यश न्यूज पॉईंट — मलकापूर 9075012816

मेडोना युनुसेट सलून — बाराज्योर्तिलींग रोड, अकोला 7507340789

पेंटर पाठक एजन्सी — महानगर पालिका मागे, अकोला 8605844453

जाहिरातीसाठी संपर्क 9209956616 | बातम्यासाठी संपर्क 9075012801

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. २९ डिसेंबर २०२५

# ‘सेलेब्रेशन’च्या नावाखाली दारू, बिअर, अमली पदार्थांचे सेवन

प्रतिनिधी २९ डिसेंबर



**उमरखेड** : नववर्ष २०२६ च्या स्वागतासाठी उमरखेड शहरात तरुणाईमध्ये उत्साहाचे वातावरण असले, तरी या जल्लोषाच्या आड व्यसनाधीनतेचे भयावह चित्र समोर येत आहे. ‘सेलेब्रेशन’च्या नावाखाली दारू, बिअर तसेच गांजासारख्या अमली पदार्थांचे सेवन वाढत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र चिंता व्यक्त होत आहे. आनंद साजरा करण्याची ही पद्धत भविष्यातील पिढीसाठी धोक्याची घंटा ठरत असल्याची भावना समाजातून व्यक्त होत आहे.

शहरातील काही भागांत तरुण मंडळी टोळक्याने जमून उघडपणे व्यसन करत असल्याचे चित्र दिसत आहे. विशेष म्हणजे अल्पवयीन, शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्येही ही प्रवृत्ती शिरकाव करत असल्याचे बोलले जात आहे. पालकांकडून मिळणाऱ्या पॉकेटमनीचा गैरवापर होत असून, शिक्षणाऐवजी व्यसनांकडे युवक वळत असल्याची तक्रार नागरिकांकडून केली जात आहे.

तालुक्यातील काही आदिवासीबहुल भागांत तसेच शाळा-महाविद्यालयांच्या परिसरात गांजाची राजरोस विक्री होत असल्याच्या चर्चा आहेत. ‘कोड वर्ड’च्या माध्यमातून कमी किमतीत गांजाची सिगारेट उपलब्ध करून दिली जात असल्याचे सांगितले जाते. यामागे संघटित टोळ्यांचे जाळे कार्यरत असून, नव्या पिढीला आपल्या विळख्यात ओढण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप होत आहे.

व्यसनाधीनतेमुळे अनेक युवक शैक्षणिकदृष्ट्या मागे पडत असून, त्यांच्या आरोग्यावरही गंभीर परिणाम होत आहेत. घरच्यांना संशय येऊ नये म्हणून लपूनछपून व्यसन करण्याकडे काही तरुण वळत असल्याचेही निदर्शनास येत आहे. यामुळे कुटुंबव्यवस्था आणि सामाजिक आरोग्य धोक्यात येत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे.

या सर्व प्रकारांकडे शासन व प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. नववर्षाच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने विशेष मोहिमा राबवून अमली पदार्थ विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, तसेच शाळा व महाविद्यालय परिसरात कडक बंदोबस्त ठेवावा, अशी मागणी होत आहे. त्याचबरोबर युवकांना योग्य मार्गदर्शन, समुपदेशन व व्यसनमुक्ती कार्यक्रमांच्या माध्यमातून मुख्य प्रवाहात आणण्याची गरज व्यक्त होत आहे. नववर्षाचा जल्लोष आनंद, सकारात्मकता आणि नव्या संकल्पांचा असावा की व्यसनांचा, असा सवाल सध्या उमरखेड शहरात चर्चेचा विषय ठरत आहे. समाज, पालक आणि प्रशासन यांनी एकत्रितपणे पुढाकार घेतल्यासच या भयावह चित्रावर आळा घालता येईल, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.

# आंतरराज्यीय गुटखा तस्करी : ६५.९८ लाखांचा मुद्देमाल जप्त, दोन आरोपी ताब्यात

प्रतिनिधी २९ डिसेंबर



**पांढरकवडा** : यवतमाळ जिल्ह्यात वाढत चाललेल्या अवैध गुटखा तस्करीवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्थानिक पोलीस प्रशासनाने कडक कारवाई केली आहे. स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळच्या पथकाने आंतरराज्यीय गुटखा तस्करीवर धडक कारवाई करत दोन इसमांना ताब्यात घेतले असून, महाराष्ट्रात बंदी असलेला सुगंधित पानमसाला व तंबाखू असा एकूण ६५,९८,०००/- किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

तेलंगणा राज्यातून राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४४ मार्गे पांढरकवड्याकडे अवैधरित्या पानमसाला व तंबाखू वाहतूक होत असल्याचे खबरींनी कळवले. पांढरकवडा–वणी उपविभाग पथकाने ढोकी गावाजवळ वाहन क्रमांक UP-94-AT-2305 थांबवले. तपासणीदरम्यान १८० पोत्यांचा साठा जप्त झाला. आरोपी मोहन सियाराम यादव (२६, ड्रायव्हर, शिवपुरी) व बुद्धा बाबुसिंग परीयार (३५, मजूर, शिवपुरी) यांना ताब्यात घेण्यात आले. जप्त केलेल्या मुद्देमालात ४५,९२,०००/- किमतीचा सुगंधित पानमसाला व तंबाखू, ६,०००/- किमतीचे मोबाईल फोन आणि २०,०,०००/- किंमतीचे आयशर वाहन समाविष्ट होते. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिता व अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली.

कारवाईचे नेतृत्व पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांनी केले. संबंधित प्रकरणी गुन्हा पांढरकवडा पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आला असून, पुढील तपास सुरु आहे.

# ऑनलाईन प्रक्रियेत अडकली ‘कापूस विक्री’

## खा. संजय देशमुखांचे पणन संचालकांना पत्र

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**यवतमाळ** : राज्य शासनामार्फत ‘कपास किसान’ ॲपद्वारे हमीभावाने कापूस खरेदीची प्रक्रिया सुरू असली, तरी ऑनलाईन नोंदणी, अप्रुव्हल आणि स्लॉट बुकिंगमधील तांत्रिक अडचणींमुळे अनेक कापूस उत्पादक शेतकरी अडचणीत सापडल्याचे समोर आले आहे. या गंभीर बाबीची खासदार संजय उत्तमराव देशमुख यांनी दखल घेत महाराष्ट्र राज्याच्या पणन संचालकांना पत्र देत कापूस खरेदी प्रक्रिया अधिक सुलभ करण्याची मागणी केली आहे.

पत्रात खासदार देशमुख यांनी नमूद केले आहे की, अनेक शेतकऱ्यांकडे स्मार्टफोन नाहीत, ॲप वापरण्याचे पुरेसे ज्ञान नसल्याने तसेच कागदपत्रे अपलोड करताना येणाऱ्या तांत्रिक अडचणींमुळे शेतकरी हमीभावाच्या कापूस खरेदीपासून वंचित राहत आहेत.

याशिवाय सीसीआयकडून मर्यादित कालावधीसाठी उपलब्ध होणारे स्लॉट ही मोठी अडचण ठरत आहे.

या परिस्थितीमुळे अनेक शेतकऱ्यांना नाईलाजाने कमी दराने खाजगी व्यापाऱ्यांना कापूस विकावा लागत असल्याची गंभीर बाबही त्यांनी निदर्शनास आणून दिली. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांची ऑनलाईन नोंदणी व अप्रुव्हल पूर्ण झाले आहे, त्या अनुक्रमे सीसीआय केंद्रांनी थेट शेतकऱ्यांशी संपर्क साधून उपलब्ध क्षमतेनुसार कापूस खरेदी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

तसेच अपरिहार्य कारणांमुळे स्वतः उपस्थित राहू न शकणाऱ्या शेतकऱ्यांना कुटुंबातील सदस्यांच्या नावाने कापूस विक्रीची मुभा देण्यात यावी. संपूर्ण कापूस खरेदी प्रक्रिया पारदर्शक, सुरळीत व शेतकरीहिताची राहील, यासाठी संबंधित यंत्रणांना स्पष्ट आदेश देऊन आवश्यक नियंत्रण व देखरेख ठेवावी, अशी मागणी खासदार संजय देशमुख यांनी पत्राद्वारे केली आहे.

# संवाद शेतकरी महिलांशी : 'दीनदयाल'मधील स्वयंसिद्धांना कांचन गडकरी ऐकतात तेव्हा..

प्रतिनिधी २९ डिसेंबर




**यवतमाळ** : "ताई, आमचे 'हे' सोडून गेले तेव्हा मला काहीच समजत नव्हतं. घरी लहान लहान लेकरं. त्यांचं शिक्षण, घर सांभाळणं, शेतीचं काय कराव ? साऱ्या समस्याच समस्या होत्या. पण या संस्थेतले हे लोक भाऊ म्हणून आले. त्यांनी धीर दिला. 'तुला जे जमेल ते कर, आम्ही आहोत मदतीला' म्हणून आधार दिला. त्यातून थोडं बळ आलं. दर भाऊबीजेला साडी चोळी करणारे, मुलांच्या शिक्षणाची सोय करून देणारे आणि मला शेळ्या, आटाचक्कीच्या रूपाने स्वयंरोजगार उभा करून देणाऱ्या या संस्थेमुळे आज मी ताठ मानेने जगू शकते. एका पोरीला शिकवून एलएलएम् केलं आहे. दुसरी मुलगी ग्रॅज्युएट होऊन आपल्या सासरी सुखात आहे. मुख्य म्हणजे, माझ्याकडे पाहण्याची समाजाची दृष्टीसुद्धा बदलली आहे."

हे आत्मविश्वासपूर्ण, तितकेच हृद्य मनोगत होते, शिरसगाव ता. नेरच्या जयश्री सावंकार या स्वयंसिद्धेचे.

यवतमाळ जिल्ह्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त परिवारातील महिला आता अबला राहिलेल्या नाहीत. आपलं दु:ख कुरवाळत बसत नाहीत. प्राप्त परिस्थितीत स्वाभिमानाने जगायला त्या शिकल्यात. प्रत्येकीची एकेक यशोगाथा आहे. अशा 500 महिलांना दत्तक घेऊन, त्यांच्यात जगण्याचं बळ देणाऱ्या दीनदयाल सेवा प्रतिष्ठानच्या निळोणा स्थित दीनदयाल प्रबोधिनीमध्ये संस्थेच्या उपाध्यक्ष ज्योती चव्हाण, सचिव विजय कद्रे, संचालक नीलिमा मंत्री यांच्या उपस्थितीत, सामाजिक जीवनात नाव कमावलेल्या कांचनताईं सोबत हा संवाद सुरू होता.

संस्कार भारतीच्या विदर्भ प्रांत अध्यक्ष कांचन गडकरी या खास शेतकरी महिलांच्या कर्तृत्वगाथा ऐकायला वेळ काढून आलेल्या. त्यांनी संस्थेत येतानाच, या शेतकरी महिलांशी बोलायचे आहे अशी इच्छा व्यक्त केली आणि सुरू झाला कर्तृत्ववतींशी भावगर्भ संवाद! यवतमाळ जिल्ह्यातील 35 स्वयंसिद्धा भगिनी त्यासाठी आल्या होत्या. त्यांच्या बरोबरच आपल्या घराशेजारी परसबाग फुलवून त्याद्वारे आपल्या कुटुंबाचे आरोग्य राखण्यासोबतच उरलेली भाजी विकून चरितार्थ चालवणाऱ्या किचन गार्डन प्रकल्पातील 20 महिलाही आल्या होत्या. सोबतच पारधी बेड्यांवर स्वास्थ्यविषयक कार्य करीत आलेल्या आरोग्यरक्षक महिला देखील या संवादप्रसंगी उपस्थित होत्या.

कांचन गडकरींनी त्यांच्यापैकी प्रत्येकीला त्या कुठल्या भागातून आल्या ? त्यांची कौटुंबिक, सामाजिक परिस्थिती कशी होती ? आजची स्थिती कशी आहे, इत्यादी विषयात चर्चा केली. एकेकीचे मनोगत ऐकताना त्या कधी गंभीर झाल्या, कधी डोळे पाण्याने डबडबले तर कधी चेहऱ्यावर प्रसन्न हास्य उमटले. सरते शेवटी या सर्व महिलांना मार्गदर्शन करताना त्या म्हणाल्या की आपला देश कर्तृत्वशालिनींचा आहे. शिवरायांना घडवणाऱ्या जिजाऊ, राज्यकारभार सांभाळणाऱ्या अहिल्यादेवी आणि इंग्रजांशी लढताना तटावरून घोडा फेकणाऱ्या झाशीच्या राणीचा हा देश आहे. त्यांनी आपल्या आयुष्यातील दु:ख पचवून रडायला नव्हे तर लढायला शिकवले. त्यांच्यामुळेच महिला अबला नाहीत, सबला आहेत हे आपल्याला कळले. अशा रणरागिणींचे वंशज असणाऱ्या तुम्ही सर्वांनीही परिस्थितीवर खंबीरपणे मात केली. आपल्यासारखे दु:ख भोगणाऱ्या इतर महिलांनाही आधार द्यायला शिका. त्यांच्याही पंखात तुमच्या प्रेरणेचे बळ येऊ द्या. दीनदयाल सेवा प्रतिष्ठान आणि या विचाराची सर्व मंडळी नक्कीच पाठीशी राहतील, आधार देतील असा विश्वासही त्यांनी बोलून दाखवला.

# सदनिका व घरखरेदीवरील १ टक्का कर रद्द करा

## क्रेडाई पदाधिकाऱ्यांचे नगराध्यक्षा प्रियदर्शिनी उईके यांना निवेदन

प्रतिनिधी २९ डिसेंबर




**यवतमाळ** : नगरपरिषदेच्या प्रशासकीय कारकीर्दीत शहर विकासाकडे दुर्लक्ष होत असून नागरिकांवर विविध करांचा बोजा वाढविण्यात आला आहे. सदनिका व घर खरेदीनंतर फेरफारासाठी आकारला जाणारा १ टक्का कर तात्काळ रद्द करण्यात यावा, अशी ठाम मागणी क्रेडाई (कॉन्फेडरेशन ऑफ रिअल इस्टेट डेव्हलपर्स असोसिएशन ऑफ इंडिया)च्या पदाधिकाऱ्यांनी नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शिनी उईके यांच्याकडे केली.

१८ जानेवारी २०२२ रोजी नगरपरिषदेचा कारभार प्रशासकाकडे गेल्यानंतर एका ठरावाद्वारे घर व सदनिका खरेदीवर १ टक्का कर आकारण्याची तरतूद करण्यात आली. गेल्या तीन वर्षांपासून हा कर नागरिकांकडून वसूल केला जात असून, शहरातील मूलभूत सुविधांकडे मात्र दुर्लक्ष झाल्याचे चित्र आहे. प्रशासकीय राजवटीत कोणताही विरोध न झाल्याने हा कर वाढ कायम राहिला, अशी भूमिका क्रेडाईने मांडली. नगरविकासात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या क्रेडाईच्या पदाधिकाऱ्यांनी नव्याने निवडून आलेल्या नगराध्यक्षा उईके यांची भेट घेऊन ही बाब त्यांच्या निदर्शनास आणून दिली. यासंदर्भात लेखी निवेदनही सादर करण्यात आले. यावर नगराध्यक्षा उईके यांनी सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले. या शिष्टमंडळात क्रेडाईचे अध्यक्ष इंजि. संजय ठाकरे, सचिव हर्षल जायले, कोषाध्यक्ष अतुल देशपांडे तसेच प्रवीण खांदवे व घनश्याम बागडी यांचा समावेश होता.

# दुचाकी लंपास

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**घाटंजी** : तालुक्यातील बोरगाव (पुंजी) शेतशिवारातून एक दुचाकी चोरीला गेल्याची तक्रार नोंदवण्यात आली आहे. फिर्यादी भाऊराव नडपेलवार (वय ५०) यांचा पुतण्या मोहित याने शेतातील धुऱ्यावर फिर्यादीच्या मालकीची काळ्या रंगाची 'स्प्लेंडर' मोटारसायकल (क्र. एमएच २९ पी ६१५०) उभी केली होती. १८ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ४:०० वाजेच्या सुमारास अज्ञात आरोपीने ही ७,००० रुपये किमतीची दुचाकी चोरून नेली. घाटंजी पोलिसांनी याप्रकरणी अज्ञात आरोपीविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला.

# डोंगरखड्यात संत जटाजी महाराज यात्रा महोत्सव

प्रतिनिधी २९ डिसेंबर




**कळंब** : तालुक्यातील डोंगर खर्डा येथे संत जटाजी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त दरवर्षीप्रमाणे याही वर्षी २७ डिसेंबर ते ३ जानेवारी दरम्यान यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांच्या मोठ्या उपस्थितीत महोत्सवाची सुरुवात झाली.

२७ डिसेंबर रोजी सकाळी घटस्थापना व दीपप्रज्वलन करण्यात आले. रात्री स्थानिक भजनी मंडळांच्या भजन कार्यक्रमाने वातावरण भक्तिमय झाले. २८ डिसेंबर रोजी सकाळी नऊ वाजता श्री चरण पूजन, महाआरती व दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. दिंडीत सहभागी होणाऱ्या प्रत्येक मंडळास ५०१ रुपयांचे मानधन देण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

दुपारी दोन ते साडेचार या वेळेत ह.भ.प. धोंडपंत दुधाने महाराज (चांदूर रेल्वे) यांच्या काल्याच्या कीर्तनाने भाविक मंत्रमुग्ध झाले. त्यानंतर ह.भ.प. नामदेव गेडाम व ह.भ.प. कवडू वरपडे यांच्या हस्ते दहीहंडी कार्यक्रम पार पडला. मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेतला.

राळेगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी संत जटाजी महाराज देवस्थानाला भेट देत दर्शन घेतले. यावेळी राणा प्रताप क्रीडा मंडळाच्या वतीने आयोजित कबड्डी सामन्यांचे उद्घाटन मंत्री उईके यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास डोंगरखर्डा ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ. नंदाताई उईके, उपसरपंच निश्चय ठाकरे, शासकीय आश्रमशाळा अंतरगावचे मुख्याध्यापक विजय शिरसागर, संतोष जयस्वाल यांच्यासह अनेक मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महागाव नगरपंचायतीत घरकुल घोटाळ्याचा आरोप

## निकष डावलून सत्ताधाऱ्यांच्या निकटवर्तीयांना लाभ; कागदपत्रांत गंभीर अनियमिततेचा दावा

प्रतिनिधी २९ डिसेंबर



**महागाव** : महागाव नगरपंचायतीत प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत (घरकुल) मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार झाल्याचा गंभीर आरोप काँग्रेस नगरसेविका जयश्री संजय नरवाडे यांनी केला आहे. पत्रकार परिषदेत त्यांनी सत्ताधाऱ्यांवर आरोप करताना कागदोपत्री पुरावे सादर केले.

नरवाडे यांनी सांगितले की, पंतप्रधान आवास योजनेच्या तिसऱ्या डीपीआरमध्ये ७०० अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी ४०० अर्ज मंजूर झाले. मात्र, या प्रक्रियेत १८ महत्त्वाच्या फायली नगरपंचायत कार्यालयातून गायब झाल्या असून याप्रकरणी पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. तरीही अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही, असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

शासकीय नियमानुसार घरकुल योजना केवळ मोकळ्या जागेवर राबविणे अपेक्षित असताना, महागाव शहरात दुसऱ्या व तिसऱ्या मजल्यावर घरकुलांचे बांधकाम सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला. धक्कादायक बाब म्हणजे अशा बांधकामांना परवानगी देत त्यासाठीचे अनुदानही वितरित करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला.

खऱ्या गरजू लाभार्थ्यांना डावलून सत्ताधाऱ्यांच्या नातेवाईकांना व निकषात न बसणाऱ्या व्यक्तींना घरकुलांचा लाभ देण्यात आल्याचा आरोप करत, एकाच तारखेला दोन वेगवेगळ्या मुख्याधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या असलेल्या फाईली आढळल्याचेही त्यांनी नमूद केले. हा प्रकार तांत्रिकदृष्ट्या अशक्य असून यामागे प्रशासकीय संगनमत असल्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली.

या पत्रकार परिषदेमुळे शहराच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. यावेळी ज्येष्ठ नगरसेवक रामराव पाटील नरवाडे, माजी उपाध्यक्ष सुरेश नरवाडे, काँग्रेस नगरसेविका जयश्री इंगोले, शिवसेना (उबाठा) गटाचे विशाल पांडे तसेच भाजप नगरसेविका रंजना दीपक आडे उपस्थित होते.

दरम्यान, घरकुल यादीतील अनियमिततेबाबत २६ डिसेंबर रोजी बोलाविण्यात आलेली विशेष सभा कर्मचारी अनुपस्थितीचे कारण देत तहकूब करण्यात आली. सर्व नगरसेवक उपस्थित असतानाही सभा रद्द केल्याने हा प्रकार अभूतपूर्व असल्याची टीका नगरसेवक रामराव नरवाडे यांनी केली.

विविध पक्षांचे नगरसेवक एकत्र आल्याने या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी होणार का, याकडे आता शहराचे लक्ष लागले आहे.

# ‘साहेब, जेवायला या... पूल तरी दुरुस्त करा!’

## पुस नदीवरील धोकादायक पुलासाठी ना. गडकरींना वनभोजनाचे निमंत्रण

प्रतिनिधी २९ डिसेंबर



**महागाव** : महागाव तालुक्यातील हिवरा (संगम) येथे पुस नदीवरील पूल गेल्या काही काळापासून अत्यंत धोकादायक बनला असून, वारंवार अपघात होऊनही प्रशासनाकडून दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर हिवरा (संगम) येथील रहिवासी हरीश कामारकर यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांना थेट पत्र पाठवत, पुलाच्या दुरुस्तीसाठी लक्ष वेधण्याचा अनोखा मार्ग अवलंबला आहे. या पत्रात कामारकर यांनी गडकरींना ‘वनभोजनाचे’ निमंत्रण देत, आपल्या भागातील परिस्थिती प्रत्यक्ष पाहण्याचे आवाहन केले आहे. “हे पत्र तक्रारीसाठी नसून, प्रेमाच्या आग्रहासाठी आहे,” असे नमूद करत त्यांनी विदर्भी पाहुणचाराचा उल्लेख केला आहे.

पुस नदीवरील हा पूल गडकरी सार्वजनिक बांधकाम मंत्री असताना उभारण्यात आला होता. सध्या पुलाचे संरक्षक कठडे तुटलेले असून, पुलावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. रात्रीच्या वेळी पथदिवे नसल्याने वाहतूक अधिकच धोकादायक होते. हा पूल सुमारे दहा ते पंधरा गावांसाठी मुख्य वाहतुकीचा मार्ग असून, अपघातांमध्ये काही नागरिकांना प्राणही गमवावे लागल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

स्थानिक प्रशासनाकडे वारंवार निवेदन करूनही दुरुस्तीची कामे होत नसल्याने, “नामदार गडकरी येणार म्हटल्यावर तरी प्रशासन जागे होईल,” या अपेक्षेने हे पत्र पाठवण्यात आल्याचे कामारकर यांनी सांगितले. गडकरींच्या दौऱ्याच्या निमित्ताने तरी पुलाचे संरक्षक कठडे, पथदिवे आणि रस्त्याची डागडुजी पूर्ण होईल, अशी आशा व्यक्त करण्यात आली आहे. देशभर रस्ते विकासासाठी ओळख असलेल्या गडकरींच्याच जुन्या कामाकडे स्थानिक यंत्रणेने दुर्लक्ष केल्याने नागरिकांमध्ये नाराजी आहे. आता या पत्राची दखल घेत प्रशासनाकडून पुलाच्या दुरुस्तीसंदर्भात काय निर्णय घेतला जातो, याकडे परिसरातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

सोमवार दि. २९ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com

ज्याचा वशिला, त्याचं कुत्र काशीला..




## अधिकाऱ्यांची भ्रष्टनीती, कुंपणानेच खाल्ली शेती...

# पोकरा योजनेची माती !

*** पोखरा योजनेमधील भ्रष्टाचाराची कसून चौकशी आवश्यक * साहित्य खरेदीतील अनेक गैरप्रकार येणार चव्हाट्यावर**

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प योजना अर्थात (पोकरा) योजनेतील गैरप्रकाराची चौकशी केली जात आहे. रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील पोकरा योजनेतून काही ठराविक कुटुंबात लाखों रुपयांची खिरापत वाटून त्यात तालुकास्तरीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी उखळ पांढरे करून घेतले आहे. कर्मचारी व अधिकारी यांच्या भ्रष्टानितीमुळेच पोकरा भाग -१ या योजनेची माती झाली असल्याची चर्चा जिल्हाभर होत आहे. परिणामी या गैरप्रकाराची वरिष्ठ स्तरावरून कसून चौकशी व्हावी अशी मागणी सर्व सामान्य नागरिक करीत आहेत. शेलुखडसे येथील झालेल्या गैरप्रकाराची सखोल चौकशी झाल्यास अनेक धक्कादायक बाबी समोर येणार असून या योजनेतील बेधुंद भ्रष्टाचार चव्हाट्यावर येणार आहे. परिणामी भ्रष्टाचाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत. रिसोड तालुक्यातील या प्रकरणामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.





नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प योजना ( पोकरा ) अंतर्गत अकोला जिल्ह्यात काही शेतकरी गट आणि कंपन्यांनी साहित्याची खरेदी न करता गैरप्रकार केल्याचे प्रकार समोर आले होते. या प्रकरणात दोषी गट तसेच कृषी सहाय्यक आणि कृषी अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई केली जाईल अशी घोषणा तत्कालीन कृषीमंत्र्यांनी विधान परिषदेत केली होती.

कारण विरोधी पक्षांनी या गंभीर प्रकरणी लक्षवेधीच्या माध्यमातून अनेक प्रश्न उपस्थित केले होते. त्याला उत्तर देतांना ' पोकराअंतर्गत अवजारे बँक उभारणीच्या कामात अनियमितता झाल्याचा प्रकार उघडकीस आला असल्याचा खुलासा तत्कालीन कृषिमंत्र्यांनी केला होता. याची दखल घेत अमरावती विभागीय कृषी सहसंचालक यांनी सखोल चौकशीचे आदेश दिल्याने या योजनेतील अनेक गैरप्रकार चव्हाट्यावर आले होते. त्यात दोषींवर गुन्हे दाखल होऊन सक्तवसुली करण्यात आली आहे. अशीच चौकशी वाशिम जिल्ह्यातील गैरप्रकाराची व्हावी अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील पोकरा योजनेतील झालेले अनेक गैरप्रकार हे कृषी विभागाचे कर्मचारी आणि अधिकारी यांच्या मनमानी कारभाराचे उत्कृष्ट उदाहरण असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे अशा मुजोर कर्मचाऱ्यांवर वरिष्ठांचा जरब नसल्याची बोंब सर्व सामान्य लोक करीत आहेत. परिणामी कृषी विभागाची नामुष्की चव्हाट्यावर येत आहे.

शेतकऱ्यांना तांत्रिक मार्गदर्शन आणि शेती उत्पन्न वाढविण्यासाठी शासन कृषी विभागांअंतर्गत करोडो रुपयांच्या योजना राबवत आहे. त्यात नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजना अर्थात पोकरा ही एक महत्वाकांक्षी अशी योजना आहे. या योजनेत समाविष्ट करण्यात आलेल्या गावांचा कायापालट होतो एव्हढी क्षमता असलेली ही योजना आहे. मात्र स्थानिक पातळीवर काम करणाऱ्या काही कर्मचाऱ्यांनी वरिष्ठांच्या आशीर्वादाने या योजनेची माती केली आहे. याबाबत आता वाशिम जिल्ह्यातून अनेक तक्रारी समोर येत आहेत. रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील या गंभीर प्रकाराची कसून चौकशी केली तर या योजनेतील मोठे घबाड उघड होणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. त्यामुळे जिल्ह्यात खळबळ उडाली असून सदर प्रकरणात जी चौकशी सुरू झाली आहे ती पारदर्शक होत आहे का ? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. सदर गंभीर गैरप्रकाराची थातुरमातुर चौकशी करून प्रकरण बासनात गुंडाळून ठेवले तर पोकरा भाग -२ या योजनेची देखील अशीच माती होईल अशी शंका व्यक्त केली जात आहे.

गरज असलेले पात्र लाभार्थी जाणीवपूर्वक डावलून एकाच कुटुंबात वेगवेगळ्या व्यक्तींच्या नावावर लाखों रुपयांचे अनुदान देणे कितपत योग्य आहे हा महत्वाचा मुद्दा यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे. परिणामी यात तपास अधिकारी कसा तपास करतात याकडे सर्व जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## थोडक्यात

### मंगरूळपीर शहरात मतदारांचा सन्मान

***साडी, आर्थिक मदत व मिठाईचे वितरण**
***प्रा. नंदलाल पवार मित्र मंडळाचा पुढाकार**



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर शहरात नुकताच निवडणुकीचा निकाल पार पडला असून या निवडणुकीमध्ये ज्या कार्यकर्त्यांनी अथक परिश्रम घेऊन सहकार्य केले त्या कार्यकर्त्यांचे प्रा.नंदलाल पवार मित्र मंडळाने ता २७ रोजी साडी, आर्थिक मदत व मिठाई वितरण करून सन्मान केला. यापूर्वी मंगरूळपीर शहरात नगर परिषदेच्या निवडणुकीत जातीच्या समीकरणावर आधारित उमेदवाराला मते दिली जात असे मात्र यावेळी उमेदवाराच्या कार्यशैली सामाजिक बांधिलकीचा विचार करून मतदारांनी उमेदवाराला पसंती दर्शवली ही बाब लक्षात घेऊन येथील सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार नंदलाल पवार यांनी निवडणुकीचा निकाल पार पडल्यानंतर मतदाराप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याच्या उद्देशाने प्रभाग प्रभाग नऊ मधील बहुतांश नागरिकांचा भावपूर्ण सत्कार करून आभार मानले.या नागरिक सन्मान सोहळा कार्यक्रमात अजय खिराडे प्रकाश संगत बाळासाहेब घोडचर, कळवे, आदी मान्यवर उपस्थित होते. वाशिम मंगरूळपीर विधानसभेचे लोकप्रिय आमदार श्याम खोडे यांनी कुठल्याही प्रकारचा भेदभाव न करता समस्त वाशिम जिल्ह्यातील जनतेचा विकास व्हावा हा मानवतावादी दृष्टिकोन समोर ठेवून मोठ्या प्रमाणात विकासात्मक कामे केली ही प्रशसनिय व महत्वपूर्ण बाब लक्षात घेऊन येथील दानशूर व्यक्तिमत्व नंदलाल पवार यांनी श्याम खोडे यांना साडेआठ लाख रुपयाची सोन्याची साखळी देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मोठ्या प्रमाणात नागरिक उपस्थित होते.

# शिरपूर येथील जैन मंदिरात वाद, दिगंबर समाजाचा इशारा मोर्चा !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

दिनांक १८ डिसेंबर १९ डिसेंबर व २६ डिसेंबर रोजी अंतरिक्ष पार्श्वनाथ मंदिरामध्ये दोन पंथीयांच्या कामगारांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरा लावण्याचा कारणावरून प्रचंड हाणामारीच्या घटना घडल्या आहेत. सदर घटनेमध्ये दिगंबर समाजाचे दोन पुजारी हे गंभीर जखमी झाले आहेत. प्रशासनाविरुद्ध रोष व्यक्त करण्यासाठी व गुन्हेगारांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यासाठी २८ डिसेंबर रोजी दिगंबर समाजाचा इशारा मोर्चा पोलीस स्टेशनवर काढण्यात आला होता.

दिनांक १८ , १९ डिसेंबर व २६ डिसेंबर रोजी येथील अंतरिक्ष पार्श्वनाथ मंदिरामध्ये सीसीटीव्ही कॅमेरा लावण्याच्या कारणावरून दोन्ही पंथीयांच्या कामगारांमध्ये तुफान हाणामारी झाली होती. दिगंबर व श्वेतांबर या दोन्ही बाजूच्या परस्पर फिर्यादीवरून २० कामगारांवर विविध कलमा अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत . सदर घटना घडल्यानंतरही दिनांक २६ डिसेंबर रोजी पुन्हा दिगंबर पंथीयाच्या पुजाऱ्यास चार ते पाच श्वेतांबर कामगारांनी बेदमपणे व अमानुष मारहाण केली होती.यामध्ये विजय जैन हा गंभीर जखमी झाला आहे.सदर पुजाऱ्यास वाशिम येथे



झालेल्या घटनेबद्दल समाज बांधवांनी केला रोष व्यक्त

रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अद्याप या प्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला नाही. सदर प्रकरणाचा निषेध व्यक्त करण्यासाठी व गुन्हेगा रांना तत्काळ अटक करण्यासाठी दिनांक २८ डिसेंबर रोजी एलक श्री सिद्धांत सागर जी महाराज व बा. ब्र. तात्या भैया यांच्या नेतृत्वात हा इशारा मोर्चा शिरपूर पोलीस स्टेशन वर धडकला होता . निकलंक निकेतन इथून सदर मोर्चाला सुरुवात करण्यात आली होती.दरम्यान शेकडो दिगंबर समाज या मोर्चामध्ये सहभागी झाले होते.दरम्यान झालेल्या घटनेबाबत दिगंबर समाजाच्या संतप्त भावना यावेळी दिसून आल्या. यावेळी उपस्थित समाजाला मार्गदर्शन करताना बालब्रम्हचारी तात्या भैया यांनी सांगितले की मंदिराच्या आत मध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यासाठी प्रशासनाने मदत करावी, गुन्हेगारी प्रवृत्तीचे व्यक्ती किंवा ज्यांच्यावर यापूर्वी गंभीर गुन्हे दाखल झालेले आहेत ,सार्वजनिक उत्सव काळामध्ये त्यांच्यावर दरवर्षी प्रतिबंधात्मक कारवाई पोलीस प्रशासनातर्फे करण्यात येते अशा कामगारांना मंदिर व मंदिर परिसरात बंदी करावी या व इतर मागण्यांचे निवेदन त्यांनी यावेळी ठाणेदार केशव वाघ यांना देण्यात आले. सदर मोर्चा मध्ये शिरपूर व परिसरातील शेकडो दिगंबर पंथीय महिला व पुरुष सहभागी झाले होते. मोर्चादरम्यान प्रशासनाविरुद्ध प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली. व रोष व्यक्त करण्यात आला. प्रशासनाने सदर प्रकरणावर तत्काळ कारवाई करावी. अन्यथा दिगंबरा समाजाकडून यापुढे तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला.दरम्यान सदर मोर्चा हा शांततेत संपन्न झाला.

# य.च. महाविद्यालयात राष्ट्रीय ग्राहक दिन

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

श्री मोतीरामजी ठाकरे शिक्षण प्रसारक मंडळ, कासोळा द्वारा संचालित यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालयात मा.चंद्रकांत ठाकरे, माजी अध्यक्ष, जि. प.वाशिम तथा सचिव, श्री मोतीरामजी ठाकरे शिक्षण प्रसारक मंडळ कासोळा यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभाग,

तहसील कार्यालय, मंगरुळपीर व अखिल भारतीय ग्राहक पंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार, दिनांक २४ डिसेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय ग्राहक दिन साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाचे आयोजन यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय, मंगरुळपीर येथील सभागृहात करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. श्री







जुगलकिशोरजी कोठारी (जिल्हाध्यक्ष, अ.भा.ग्राहक पंचायत) हे होते. कार्यक्रमाचे मार्गदर्शक मा. श्री अभयजी खेडेकर (विदर्भ प्रांत संघटन मंत्री, अ.भा.ग्राहक पंचायत) तथा प्रमुख अतिथी म्हणून मा. श्री चंद्रकांतजी ठाकरे (माजी जिल्हा परिषद अध्यक्ष) तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे आणि विविध विभागांचे मान्यवर अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन मा. श्री राजेंद्रजी जाधव (उपविभागीय अधिकारी, मंगरुळपीर) व मा. श्री सुधाकरजी अनासुने (तहसीलदार, मंगरूळपीर) यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

मार्गदर्शक मा. श्री अभयजी खेडेकर (विदर्भ प्रांत संघटन मंत्री, अ.भा.ग्राहक पंचायत) यांनी ग्राहक हक्क, ग्राहक संरक्षण कायदे व आजच्या काळातील ग्राहकांची जबाबदारी यावर सखोल मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा . कावरे, प्रास्ताविक डॉ. अनंत शिंदे यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे यांनी या पुढील काळात सुद्धा आम्हाला विविध कार्यक्रम आयोजन करण्याची संधी उपलब्ध करून द्यावी असे मत व्यक्त करून उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता डॉ. अनंत शिंदे , प्रा. मनवर, राष्ट्रीय सेवा योजना महिला कार्यक्रम अधिकारी, प्रा. धनजकर, कनिष्ठ विभागातील प्रा. कावरे, प्रा. सुर्वे, प्रा. डोळेवार, प्रा.भगत प्रा.अलोने प्रा.कडू मॅडम, विलास गावंडे, संतोष, ठोकळ, अतुल भोयर, किशोर गावंडे, रवी राठोड, सुरेश कंकाळ, राजू आवारे इत्यादींनी अथक परिश्रम घेतले.

# डॉ. अभिमन्यू अर्जुनराव उदगीरे यांना पीएच.डी पदवी प्रदान



● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

**राजस्थान आर्यन आर्ट्स, श्री मिठुलालजी कचोलिया वाणिज्य आणि श्री सत्यनारायणजी रामकृष्णजी राठी विज्ञान महाविद्यालय वाशिम येथील प्राणीशास्त्र विभागातील विद्यार्थी अभिमन्यू अर्जुनराव उदगीरे यांना संत गाडगेबाग अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्याकडून प्राणीशास्त्र विषयात आचार्य (पीएच. डी) पद?वी प्रदान करण्यात आली आहे. अभिमन्यु उदगीरे यांनी आजवर ९ शोधनिबंध नामवंत अंतरराष्ट्रिय जर्नल्समध्ये प्रकाशित केले आहेत.**

उदगीरे यांनी राजस्थान आर्यन आर्ट्स, श्री मिठुलालजी कचोलिया वाणिज्य आणि श्री सत्यनारायणजी रामकृष्णजी राठी विज्ञान महाविद्यालय वाशिम येथील उपप्राचार्य, विज्ञान विभागाचे प्रमुख, प्राणीशास्त्र विभागाचे प्रमुख, व पी.एच.डी मार्गदर्शक प्राध्यापक डॉ. हेमंतकुमार विठ्ठलराव वंजारी यांच्या मार्गदर्शनाखाली 'पत्स्न्हूप्ईंग्ो ग्ह ईप्ीं इग्पे र्द ीप्स् अ्रूग्ू ईर्प्ीं' या विषयावर संशोधन पूर्ण केले. हे संशोधन आर.ए. महाविद्यालय येथील संशोधन केंद्रात करण्यात आले. या संशोधनात पत्स्न्हूप् ज्ग्ेू प्रजातीतील जिवांचा अभ्यास करण्यात आला असून, गोडया पाण्यातील माशांवर होणाऱ्या प्रादुर्भावामुळे मत्यव्यवसायामध्ये होणाऱ्या आर्थिक नुकसानीचा सखोल आढावा घेण्यात आला आहे. या अभ्यासामुळे वाशिम जिल्ह्यातील मत्यव्यवसाय क्षेत्रामध्ये प्रत्यक्ष लाभ होणार असल्याचे मत व्यक्त करण्यात येत आहे. संशोधन काळात त्यांना संशोधन मार्गदर्शक डॉ. हेमंतकुमार विठ्ठलराव वंजारी, प्राचार्य डॉ. ओमप्रकाश झंवर (आर.ए. महाविद्यालय), संशोधन केंद्र प्रमुख डॉ.रचना पचोरी, प्राणिशास्त्र विभाग प्रमुख डॉ. प्रदीपकुमार पाटील, प्राध्यापक डॉ. शेषराव राठोड, डॉ. सचिन तायडे, डॉ.जया सोमटकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

आर.ए. महाविद्यालयाचे अध्यक्ष श्री. ठाकूरदासजी मालानी, सचिव श्री. सुधीरजी राठी, राजस्थान एड्युकेशन च्या माजी अध्यक्षा व विद्यमान सदस्य श्रीमती शिलाताई राठी यांनी त्यांचे अभिनंदन केले.यशाबद्दल त्यांना त्यांचे वडील अर्जुनराव उदगीरे, आई संगीता उदगीरे, सहकारी मित्र विशाल खडसे, भागवत सावके, गोपाल काटेकर, यश वाकुडकर, गोपाल आदमणे, सोमेश काटेकर यांनी त्यांचे कौतुक केले.

## स्वर्गीय लक्ष्मण अण्णा मादसवार;

# समाजकारण, राजकारण आणि मैत्रीचा जीवंत वस्तुपाठ!

वाशीम शहराचे ज्येष्ठ नागरिक, माझे मानलेले मोठे बंधू, कौटुंबिक सदस्य, भारतीय जनता पार्टी वाशिम शहरचे माजी अध्यक्ष, माजी नगरसेवक तथा थोर समाजसेवक आदरणीय स्वर्गीय श्री. लक्ष्मण अण्णा मादसवार यांच्या दुःखद निधनाची बातमी ऐकून मन सुन्न झाले आहे. ही बातमी केवळ धक्कादायकच नाही तर असंख्य कुटुंबांसाठी, मित्रपरिवारासाठी आणि संपूर्ण वाशिम शहरासाठी कधीही न भरून येणारी पोकळी निर्माण करणारी आहे.

स्वर्गीय अण्णा हे आमच्या कुटुंबासाठी केवळ एक राजकीय नेते नव्हते, तर घरातीलच एक सदस्य होते. आमचा त्यांच्याशी असलेला कौटुंबिक जिव्हाळा, आपुलकीचे नाते आणि विश्वासाचे बंध अतूट होते. सुख-दुःखाच्या प्रत्येक प्रसंगी अण्णांची उपस्थिती ही आम्हाला आधार देणारी असायची.गेल्या काही महिन्यांपासून स्वर्गीय अण्णा विविध आजारांनी त्रस्त होते. त्यांच्या कुटुंबीयांनी त्यांच्यावर अत्यंत प्रेमाने आणि आस्थेने विविध उपचार केले. अखेर अकोला येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू असतानाच वयाच्या ७१ व्या वर्षी त्यांनी आपल्यापासून कायमचा निरोप घेतला. नियतीचा हा निर्णय आमच्यासाठी स्वीकारणे आजही अत्यंत कठीण आहे.मागील महिन्यात मी वाशिमला आलो असता स्वर्गीय अण्णांची आवर्जून भेट घेतली होती. त्याआधी मुंबई येथील माझे मोठे बंधू श्री. सुधीर भाऊ दाभाडे यांनीही वाशिम भेटीदरम्यान अण्णांची भेट घेतली होती. त्या भेटी आज आठवताना मन अधिकच हळवे होते.स्वर्गीय अण्णा म्हणजे वाशिममधील मैत्रीचा एक स्वतंत्र अध्याय होते. स्व. श्री. शंकर नाना कोकास आणि श्री. छोटू माहुले यांच्यासोबतची त्यांची मैत्री वाशिममध्ये 'त्रिकूट' म्हणून प्रसिद्ध होती. ही मैत्री केवळ शब्दांपुरती नव्हे, तर त्याग, संघर्ष आणि निष्ठेच्या कसोटीवर तावून-सुलाखून निघालेली होती.आणीबाणीच्या काळात स्वर्गीय अण्णा, शंकर नाना कोकास आणि छोटू माहुले यांनी एकत्रितपणे कारावास भोगला. त्या संघर्षाची दखल घेत विद्यमान सरकारने काही महिन्यांपूर्वी त्यांना स्वातंत्र्यसैनिकाचा दर्जा देऊन नियमित



पेन्शन सुरू केली होती. हा त्यांच्या आयुष्यातील सन्मानाचा क्षण होता.राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारतीय जनता पार्टीच्या विचारधारेतून प्रेरणा घेऊन स्वर्गीय अण्णांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजसेवा आणि संघटन कार्यासाठी वाहिले. ते आमच्यासाठी केवळ मोठे बंधू नव्हे, तर मार्गदर्शक होते. अडचणीच्या काळात, संकटाच्या क्षणी अण्णा नेहमीच आमच्या पाठीशी ठामपणे उभे राहिले.वाशिम शहर भाजपचे अध्यक्ष म्हणून कार्य करताना पक्ष वाढीसाठी त्यांनी घेतलेली मेहनत, त्यांची तळमळ आणि त्याग मी स्वतः अनुभवला आहे. नगरसेवक म्हणून तसेच त्यांच्या अर्धांगिनीच्या नगरसेवकपदाच्या कार्यकाळातही त्यांनी आपल्या प्रभागाच्या विकासासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. संघटन कौशल्य हा त्यांचा विशेष गुण होता.आर्थिक परिस्थिती अत्यंत साधी असूनही त्यांनी कधीही तक्रार केली नाही. आनंदाने, दिलदारपणे आणि सर्वांना सोबत घेऊनच त्यांनी आपले संपूर्ण जीवन व्यतीत केले. दिलदारपणा, कणखरपणा आणि माणुसकी हे स्वर्गीय अण्णांचे स्थायी भाव होते.खरं तर स्वर्गीय अण्णांचा जीवनातील सुवर्णकाळ नुकताच सुरू झाला होता. मात्र अचानक आलेल्या आजाराने त्यांना त्रस्त केले आणि नियतीने त्यांना आमच्यापासून हिरावून नेले. त्यांच्या निधनाने केवळ मादसवार कुटुंबीयांचेच नव्हे, तर आमच्यासारख्या असंख्य कुटुंबीयांचे अपूरणीय नुकसान झाले आहे.आपले परममित्र शंकर नाना कोकास आणि छोटू माहुले यांच्या मनःस्थितीचा विचार केला तरी मन अधिक व्याकूळ होते. अशा कर्तृत्ववान, प्रेमळ आणि आपुलकीच्या व्यक्तिमत्त्वाचा विरह अत्यंत वेदनादायी आहे.अण्णा, आपल्या जाण्याने आम्हाला प्रचंड धक्का बसला आहे. हा धक्का सहन करण्याची शक्ती ईश्वर आम्हा सर्वांना देवो, हीच प्रार्थना. आपल्या आठवणी, आपले विचार आणि आपले कार्य सदैव आमच्या मनात जिवंत राहील.स्वर्गीय लक्ष्मण अण्णा मादसवार यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, हीच विनम्र श्रद्धांजली.

**शोकाकुल : सतीश दाभाडे,** नागपूर

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
सोमवार, दि. २९ डिसेंबर २०२५ http://epaper.citynewssuperfast.com

# अकोल्यात लोकशाहीचा उत्सव !

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**अकोला :** अकोला महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने शहरात लोकशाहीचा जागर सुरू झाला आहे. प्रत्येक नागरिकाने मतदानाचा हक्क बजावून शहराच्या विकासात सहभागी व्हावे, या उदात्त हेतूने मनपा प्रशासनाने शहरात ठिकठिकाणी व्यापक जनजागृती मोहीम राबवली आहे. 'माझे मत, माझी जबाबदारी' असा संदेश देत आज शहरातील ऑटो आणि प्रमुख चौकांमधील दुभाजकांवर आकर्षक स्टीकर्स लावून नागरिकांना मतदानाचे आवाहन करण्यात आले.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. सुनील लहाने यांच्या प्रेरणेतून आणि अतिरिक्त आयुक्त सुमेध अलोने यांच्या मार्गदर्शनाखाली हा अभिनव उपक्रम राबवण्यात येत आहे. अकोलेकरांनी केवळ मतदार न राहता 'जागरूक नागरिक' म्हणून राष्ट्रीय कर्तव्यात सहभागी व्हावे, हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे

. शहरातील वर्दळीची ठिकाणे जसे की, नवीन बस स्थानक, अशोक वाटिका चौक, दुर्गा चौक, गांधी रोड आणि नेहरू पार्क चौक या परिसरातील ऑटोवर प्रेरणादायी घोषवाक्ये लावण्यात आली आहेत.

अशा सकारात्मक संदेशांमुळे नागरिकांमध्ये मतदानाविषयी उत्साहाचे वातावरण निर्माण होत आहे.या मोहिमेत मनपा शिक्षणाधिकारी तथा नोडल अधिकारी हरिश्चंद्र इटकर, संजय खराटे, हबीब शाहिदी, मो. अनवार हुसैन, जनसंपर्क अधिकारी भरत शर्मा, प्रशांत राजुरकर, यशवंत दुधांडे, अब्दुल शफीक, आकाश बागडे, किशोर गुजर, गौरव श्रीवास, शैलेश पवार यांसह अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून जनजागृती केली.अकोला महानगरपालिकेने सुरू केलेली ही मोहीम केवळ निवडणूक प्रक्रिया नसून, शहराच्या उज्ज्वल भविष्यासाठी नागरिकांना दिलेली एक 'साद' आहे. आपल्या एका मताने शहराचे नशीब बदलू शकते, हा सकारात्मक विचार घराघरात पोहोचवण्याचे काम या उपक्रमातून होत आहे.

### ♦ महापालिका मतदार जागृतीचा उच्चांक



मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी 'ऑटो आणि चौक' जनजागृती उपक्रम
लाखो मतदारांपर्यंत पोहचण्यासाठी महापालिका आयुक्तांची जनजागृती मोहिम
आकर्षक स्टीकर्स लावून मतदानासाठी मतदारांना प्रोत्साहित करण्याची तयारी

'मी मतदान करणारच, तुम्ही पण करा !'
'माझं मत - माझा हक्क, माझा देश - माझा अकोला'
'दे दे वोट दे - लोकशाहीला साथ दे'
'मतदान करून राष्ट्रीय महोत्सवात सहभागी व्हा'

# भाजपचा बालेकिल्ला कायम ठेवण्यासाठी माजी महापौर विजय अग्रवाल मैदानात

- समर्थकांच्या अफाट उत्साहात उमेदवारी अर्ज दाखल !
- शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत विजय अग्रवाल यांचा अर्ज दाखल
- २०१७ च्या निवडणुकीतील विक्रमी मताधिक्याचा वारसा कायम
- भाजपची एकजूट आणि 'नंबर वन' स्थान टिकवून ठेवण्याचा निर्धार

**अकोला :** अकोला महानगरपालिकेच्या राजकारणातील चाणक्य आणि विकासकामांचा धडाका लावणारे खंबीर नेतृत्व म्हणून ओळखले जाणारे माजी महापौर विजय अग्रवाल यांनी आज आपल्या शेकडो समर्थकांसह शक्तीप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल केला. प्रभाग क्रमांक ५ (राम नगर, लहान उमरी ) मधून त्यांनी आपली दावेदारी निश्चित केली असून, त्यांच्या या एन्ट्रीमुळे निवडणुकीतील चुरस कमालीची वाढली आहे.



## महापौरपदाचे प्रबळ दावेदार

अग्रवाल यांची ज्येष्ठता आणि प्रशासनावरील पकड पाहता, ते पुन्हा एकदा महापौरपदाचे प्रबळ दावेदार मानले जात आहेत. भाजपच्या 'मिशन अकोला'चे नेतृत्व करताना त्यांनी संपूर्ण शहरातील जागा जिंकण्यासाठी रणनीती आखल्याचे स्पष्ट केले. त्यांच्या उमेदवारीमुळे राम नगर, लहान उमरी प्रभागात सध्या तरी भाजपचे पारडे जड दिसत असले, तरी प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी मतदार कोणाच्या पदरात कौल टाकतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल.

## विकासकामांच्या शिदोरीवर विजयाचा विश्वास

अकोला शहरात 'चकचकीत प्रभाग' ही ओळख निर्माण करण्यात विजय अग्रवाल यांचा मोठा वाटा आहे. आपल्या प्रभागातील रस्ते, पाणी आणि मूलभूत सोयीसुविधांचा दर्जा उंचावल्याने मतदारांचा त्यांच्यावर दांडगा विश्वास आहे. २०१७ च्या निवडणुकीत त्यांनी तब्बल ६ हजार मते मिळवून आपल्या प्रतिस्पर्ध्याला सुमारे ३ हजार मतांच्या फरकाने धूळ चारली होती. हाच 'विजयाचा पॅटर्न' यंदाही कायम राहील, असा विश्वास भाजप कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे.

## अकोल्याच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प

उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना विजय अग्रवाल यांनी आपले आगामी व्हिजन स्पष्ट केले. ते म्हणाले की:'अकोला शहराचा कायापालट करणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या माध्यमातून शहरासाठी जास्तीत जास्त निधी खेचून आणण्यावर आमचा भर असेल. अकोल्यात भारतीय जनता पक्ष हा पहिल्या क्रमांकाचा पक्ष असून, यंदाच्या निवडणुकीत भाजपचे जास्तीत जास्त नगरसेवक निवडून आणून महापालिकेत पुन्हा एकदा निर्विवाद सत्ता प्रस्थापित करू.'

# आज आणि उद्या उडणार नामांकनासाठी प्रमुख उमेदवारांची झुंबड

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**अकोला :** महानगरपालिका निवडणुकीसाठी नामांकन प्रक्रियेला आता खूपच कमी वेळ शिल्लक आहे. उद्या, मंगळवारी दुपारी २ वाजता नामांकन दाखल करण्याची अंतिम तारीख आहे.

त्यामुळे नामांकन दाखल करण्यासाठी फक्त नऊ तास शिल्लक आहेत, निवडणुकीच्या नामनिर्देशन प्रक्रियेच्या पाचव्या दिवशी शनिवारी एकूण १२ उमेदवारी अर्ज दाखल झाले. यापैकी महानगर विकास समितीकडून सात नामनिर्देशन अर्ज प्राप्त झाली असून त्यामध्ये भारतीय जनता पक्षाचे शहराध्यक्ष व माजी नगरसेवक जयंत मसने तसेच माजी उपमहापौर सुनील मेश्राम यांचाही समावेश होता. आज आणि उद्या, सर्व प्रमुख उमेदवार नामांकन केंद्रांवर मोठ्या संख्येने गर्दी करतील. हे शेवटचे दोन दिवस सर्वात धावपळीचे असतील, ज्यामुळे उमेदवार आणि त्यांच्या समर्थकांमध्ये वाढलेली हालचाल दिसून येईल.

महानगरपालिकेच्या महासंग्रामासाठी प्रमुख पक्षांमधील युतीबाबत अद्याप कोणताही अंतिम निर्णय झालेला नाही, ज्यामुळे अनेक इच्छुकांसाठी संभाव्य जय-पराजयाची परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहेत, शेवटच्या क्षणापर्यंत अटकळ सुरू आहे. महानगरपालिका निवडणूक प्रशासनाने सोमवारी सकाळी ११ ते दुपारी तीन आणि मंगळवारी दुपारी दोन वाजेपर्यंत नामांकन पत्रे स्वीकारली जातील अशी माहिती दिली आहे अंतिम मुदतीमुळे उमेदवारांना निर्धारित वेळेत प्रक्रिया पूर्ण करण्याचे आवाहन करण्यात आले आहे जसे जसे घड्याळाचे काटे पुढे सरकत आहेत तसा तसा निवडणुकीचा उत्साह शिगेला पोहोचत असल्याचे दिसून येत आहे सर्व प्रमुख उमेदवारांनी अद्याप त्यांचे अर्ज दाखल केलेले नसल्याने शेवटच्या क्षणी प्रमुख उमेदवारांची गर्दी वाढण्याची शक्यता आहे एकूणच सर्व इच्छुक उमेदवारांची घालमेल आणि धाकधूक चांगलीच वाढली आहे

### ♦ नामांकन दाखल करण्याचा उद्या शेवटचा दिवस






# नायलॉन मांजा वापरल्यास पालकांना 50 हजार तर, विक्रेत्यांना अडीच लाखांचा दंड

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**अकोला :** मकर संक्रांतीच्या निमित्ताने पतंग उडवताना नायलॉन मांजाचा वापर आणि विक्री केली जाते. यामुळे मोठ्या प्रमाणावर पशु-पक्षी आणि नागरिकांना इजा पोहोचते. नायलॉन मांजाबाबत कडक भूमिका घेत, मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने याचा वापर करणाऱ्यांवर आणि विक्रेत्यांवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. यानुसार, मांजा वापरणाऱ्या मुलांच्या पालकांना ५० हजार रुपये आणि विक्रेत्यांना २.५० लाख रुपयांचा दंड ठोठावण्याचे आदेश जारी करण्यात आले आहेत. या संदर्भात जिल्हा प्रशासनाने जाहीर सूचना प्रसिद्ध केली आहे. न्यायालयाच्या निर्देशानुसार, एखादा अल्पवयीन मुलगा नायलॉन मांजाने पतंग उडवताना आढळला, तर त्याच्या पालकांना ५० हजार रुपयांचा दंड का आकारला जाऊ नये असा प्रश्न उपस्थित करत ही कारवाई केली जाईल. तसेच, मोठी मुले किंवा व्यक्ती नायलॉन मांजा वापरताना आढळल्यास त्यांनाही ५० हजार रुपये दंड भरावा लागेल. दुसरीकडे, नियमांचे उल्लंघन करून नायलॉन मांजा विकणाऱ्या विक्रेत्यांकडे हा साठा आढळल्यास त्यांना २.५० लाख रुपयांचा दंड केला जाईल. या प्रस्तावित दंडात्मक कारवाईच्या विरोधात ज्यांना आपले विचार मांडायचे आहेत, त्यांना ५ जानेवारी २०२६ रोजी नागपूर खंडपीठासमोर उपस्थित राहून आपली बाजू मांडण्याची संधी देण्यात आली आहे.



# आर.डी.जी. पब्लिक स्कूलमध्ये स्नेह संमेलन उत्साहात साजरे



प्रतिनिधी २९ डिसेंबर

**अकोला :** आर.डी.जी. पब्लिक स्कूलमध्ये 'युफोरिया २०२५' या दोन दिवसीय स्नेह संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. २७ डिसेंबर रोजी पार पडलेल्या संमेलनाचा पहिला दिवस अतिशय शानदार ठरला. यामध्ये पूर्व-प्राथमिक ते इयत्ता तिसरीपर्यंतच्या विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी प्रमुख अतिथी म्हणून आय.एम.ए. चे माजी अध्यक्ष डॉ. अनुप कोठारी आणि श्रीमती अनुप कोठारी उपस्थित होत्या. यात्रसंगी आर.डी.जी. पब्लिक स्कूलचे संचालक दिलीपराज गोयनका, सौरभ गोयनका, सौ. आशिता गोयनका, प्राचार्य कुरियचन सी.पी., उपप्राचार्या तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख श्वेता चोमवाल, भारतीय सेवा सदनच्या सदस्या प्रा. इंदुबाला चौधरी, प्रफुल संघवी आणि सुनील अग्रवाल प्रामुख्याने उपस्थित होते. सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते स्व. राधादेवीजी गोयनका आणि स्व. मधुमां यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून तसेच सरस्वती पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. पाहुण्यांच्या स्वागतानंतर तिसरीच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले.

## 'कलर्स ऑफ चाइल्डहुड' थीमने वेधले लक्ष

- रंगांचे आपल्या जीवनातील महत्त्व आणि त्यांचे निसर्गातील स्थान अधोरेखित करण्यासाठी यावर्षी 'कलर्स ऑफ चाइल्डहुड' ही संकल्पना निवडण्यात आली होती. या संकल्पनेवर आधारित चिमुकल्या विद्यार्थ्यांनी एकापेक्षा एक सरस सादरीकरण करून प्रेक्षकांची मने जिंकली.
- दरवर्षीप्रमाणे यंदाही विद्यार्थी आणि शिक्षकांच्या लेखणीला वाव देण्यासाठी शाळेच्या वार्षिक मासिकाचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यात विद्यार्थ्यांचे लेख, कविता आणि कलाकृतींचा समावेश आहे. यावेळी उपप्राचार्या श्वेता चोमवाल यांनी शाळेचा वार्षिक अहवाल सादर केला. संचालक दिलीपराज गोयनका आणि प्रमुख पाहुण्यांनी आपल्या भाषणातून उपस्थितांना मार्गदर्शन केले. या सोहळयात १००इउपस्थिती आणि विविध कलागुणांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या पूर्व-प्राथमिक ते तिसरीच्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका रूपाली देशमुख यांनी केले, तर आभार प्रदर्शन शिक्षिका श्रद्धा गिरी यांनी केले. या स्नेह संमेलनाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य कुरियचन सी.पी. आणि उपप्राचार्या श्वेता चोमवाल यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

# स्वस्त धान्य दुकानातील निकृष्ट धान्याची तक्रार

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**अकोला :** स्वस्त धान्य दुकानातून दिले जाणारे निकृष्ट दर्जाचे धान्या ऐवजी खाण्यायोग्य धान्य देण्यात यावे, अशी मागणी शहरातील नागरिकांनी केलीआहे. या संदर्भात मलकापूर, गोरक्षण रोड परिसरातील रेशनकार्डधारकांनी २५ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी व जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना निवेदन दिले. मलकापूर व गोरक्षण रोड परिसरातील स्वस्त धान्य दुकानांमधील तांदूळ व ज्वारी निकृष्ट आहे, त्यामुळे हे धान्य बदलून खाण्यायोग्य धान्य उपलब्ध करून देण्यात यावे, अशी मागणी त्यांनी निवेदनाद्वारे केली आहे. गैर प्रकाराकडे संबंधित अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे आणि नागरिकांना योग्य दर्जाचे धान्य वितरित करावे अशी मागणी देखील करण्यात आली.

# गंगा नगरात गोमांस आणि साहित्य जप्त

### ♦ विहिंप बजरंग दल कार्यकर्त्यांचा पुढाकार

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**अकोला :** गंगा नगर परिसरात गोमांस असल्याची माहिती विश्व हिंदू परिषद, बजरंग दल कार्यकर्त्यांना मिळाली. संबंधित ठिकाणी जाऊन पाहणी केली तेव्हा जवळपास तीनशे किलो गोमांस आढळले. जुने शहर पोलिसांना माहिती दिली. तसेच पोलिसांनी गोमांस आणि अन्य साहित्य जप्त केले.

गंगानगर परिसरात छुप्या पद्धतीने गोमांस विक्री केली जाते अशी चर्चा होती. त्यानुसार विहिंप बजरंग दल कार्यकर्ते सावध झाले. शहनिशा करण्यासाठी संबंधित ठिकाणी पाहणी केली तेव्हा दोन पोत्यात मांस आढळले. तीनशे किलो मांस त्या ठिकाणी जप्त केले. पोलिसांनी आरोपी विरुद्ध कारवाई केली. पुढील तपास पोलिस करीत आहेत. शहरातील रहिवासी भागात सुरू असलेल्या प्रकाराला पायबंद बसावा अशी मागणी करण्यात येत आहे. सध्या एक ठिकाण आहे परंतु त्याला वेळीच पायबंद घातला नाही तर समस्या निर्माण होईल याकडे देखील लक्ष वेधले आहे.



# तिळगुळाच्या मंद सुगंधाने दरवळली बाजारपेठ

प्रतिनिधी २९ डिसेंबर

**अकोला :** मकर संक्रांतीला अजून १६ दिवस बाकी असल्याने, या सणासाठी आवश्यक असलेले तीळ आणि गूळ विकणारी दुकाने शहरातील बाजारपेठेत आधीच थाटली आहेत. अकोला शहराची बाजारपेठ तीळ आणि गुळाच्या सुगंधित सुगंधाने भरलेली आहे. यावर्षी तीळ आणि गुळाच्या किमती किंचित वाढल्या आहेत. अकोला शहरात पश्चिम महाराष्ट्रातून येणाऱ्या गुळाला जास्त मागणी आहे, ज्यामुळे बाजारात गुळाची लक्षणीय आवक वाढली आहे. यावर्षी बाजारात लाल केशरी चिक्कीचा गूळ आणि केमिकल विरहित गुळ तसेच चहाचा गूळ व मोदक आणि गुळपट्टी आदींनी दुकाने सजली आहेत. तीळ आणि गुळाचा सुगंध बाजारपेठेत भरून राहतो, ज्यामुळे उत्सवाचे वातावरण निर्माण होत आहे. थंड हवामानात तीळ आणि गुळाचा सुगंध लोकांना आकर्षित करत आहे. थंड वाऱ्यात तीळ-गुळाची दुकाने लोकांना बाजारात आकर्षित करत आहे. अकोला शहरातील विविध मिठायांच्या दुकानात दुकानात तसेच शहरातील धान्य बाजारात तीळ-गुळाच्या मिठाई विकल्या जात आहेत. एका तीळ-गुळ विक्रेत्याने सांगितले की यावर्षी तिळगुळासाठी आवश्यक चिक्कीचा गूळ ५५ रुपये प्रति किलोने विकला जात आहे तर चांगला तीळ दीडशे रुपयांपासून १७० रुपये किलोने विकला जात आहे दुकानदारांचे म्हणणे आहे की संक्रांतीचा सण जवळ येताच तिळगुळ आणि इतर मिठाई यांची मागणी वाढेल दोन प्रकारचे तीळ विक्रीसाठी बाजारात आणण्यात आले आहेत हे लक्षात घेण्यासारखे आहे की मकर संक्रांतीचा सण अजून १६ दिवसांवर आला असताना अकोला शहरातील बाजारपेठांमध्ये उत्सवाचा उत्साह दिसू लागला आहे संक्रांतीच्या आधीच शहरातील चौकांमध्ये आणि मुख्य बाजारपेठेत तीळ आणि गूळ विकले जात आहेत








हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ▪ संपर्क – 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/2012/49642, RRC Helpline No. 8484842135